POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकारी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-२२१ ● मुंबई, रविवार, १५ मार्च २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA



### सरकारने घेतला मोठा निर्णय, नवा नियम आजपासूनच लागू, टेन्शन वाढलं

युद्धामुळे मध्य पूर्वेत मोठा तणाव पहायला मिळत आहे. युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने होर्मूज स्ट्रेट बंद केला आहे. होर्मूज स्ट्रेट बंद झाल्यामुळे सध्या जागातील अनेक देशांमध्ये भीषण इंधन टंचाई निर्माण झाली आहे. जगाला जेवढ्या कच्च्या तेलाची गरज असते, त्यातील सुमारे 25 टक्के वाहतूक या मार्गेने होते. तर भारताला जेवढ्या कच्च्या तेलाची आणि इंधनाची गरज आहे, त्यातील सुमारे 40 टक्के वाहतूक या मार्गाने होते. दरम्यान मध्य पूर्वेत निर्माण झालेल्या तणावामुळे आखाती देशातील होणारा इंधन पुरवठा ठप्प झाला आहे. याचा फटका हा इतर देशांप्रमाणेच भारताला देखील मोठ्या प्रमाणात बसला आहे. अनेक ठिकाणी गॅस सिलिंडरची टंचाई जाणवत आहे. गॅस सिलिंडर उपलब्ध नसल्यानं अनेक हॉटेल चालकांवर सध्या हॉटेल बंद ठेवण्याची वेळ आली आहे. तसेच घरगुती वापराच्या गॅससाठी देखील नागरिकांवर आता लाईन लावण्याची वेळ आली आहे. यामुळे नागरिकांचे हाल सुरू आहेत. दरम्यान या सर्व परिस्थितीवर केंद्र सरकारकडून लक्ष ठेवलं जात असून, नागरिकांना सुरळीत गॅस सिलिंडरचा पुरवठा कसा होईल यासाठी प्रयत्न सुरू आहेत. याच सर्व पार्श्वभूमीवर आात केंद्रीय पेट्रोलियम मंत्रालयानं मोठा निर्णय घेतला आहे. ज्यांच्या घरात पाइपद्वारे नैसर्गिक गॅसचा पुरवठा होतो, अशा नागरिकांना आता घरगुती एलपीजी गॅस कनेक्शन ठेवता येणार नाहीये. ज्यांच्याकडे पीएनजी आणि एलपीजी दोन्ही कनेक्शन आहेत, त्यांनी एलपीजी कनेक्शन तात्काळ परत करावे, असं केंद्र सरकारने म्हटलं आहे. तसेच पीएनजी कनेक्शन असलेल्या व्यक्तींना एलपीजी सिलिंडर रिफिल देखील आता मिळणार नाहीये. हा आदेश आजपासून लगेच लागू करण्यात आला आहे.

**टेन्शन वाढलं**

दरम्यान जिथे अद्याप पीएनजी गॅस पोहोचलेला नाही, अशा लोकांना एलपीजी गॅसचा नियमित आणि सुरळीत पुरवठा व्हावा, हा या निर्णयामागे सरकारचा हेतू आहे. मात्र अनेक ग्राहक असे आहेत की, त्यांच्या नावे पीएनजी आणि एलपीजी असे दोन्ही कनेक्श आहेत. जर पीएनजी गॅस पुरवठ्यामध्ये काही समस्या निर्माण झाली तर अशा परिस्थितीमध्ये त्यांनी आपल्या घरात एलपीजीचं सिलिंडर देखील आणून ठेवलं आहे. मात्र आता सरकारच्या नव्य आदेशामुळे यातील कोणतंही एकच कनेक्शन वापरता येणार असल्यानं अनेकांचं टेन्शन वाढलं आहे.

# राज्यात गॅसचा काळाबाजार!

## पुरवठा विभागाकडून 110 गॅस सिलिंडर जप्त, 163 गॅस वितरकांची झडती




■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

इराण-इस्रायल युद्धामुळे भारतीय नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. युद्ध इराण-इस्रायलमध्ये असलं तरी त्याचा मोठा फटका भारताला बसलाय. देशभरात गॅसचा तुटवडा निर्माण झालाय. महाराष्ट्रात देखील गॅससाठी नागरिकांनी लांबच लांब रांगा लावल्या आहेत, युद्धाच्या झळीत महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सिलिंडरमध्ये काळाबाजार झाल्याचं दिसून येतंय. अनेक गॅस एजन्सीवाले सिलिंडरचा साठा करून ठेवतायत त्यामुळे गॅसचा तुटवडा आणखीनच निर्माण होतोय, गॅस सिलिंडरची टंचाई असताना भंडा-यात जिल्हा पुरवठा विभागानं साठेबाजांवर कारवाई केलीये. शहरातील राजीव गांधी चौकातील एका दुकान मालकावर तसंच दवडीपार येथील सीएससी केंद्रावर धाड टाकून 37 बेकायदा साठवून ठेवलेले गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत.

**पुरवठा विभागाकडून 43 गॅस सिलिंडर जप्त, 163 गॅस वितरकांची झडती**

व्यावसायिक सिलिंडर मिळत नसल्यानं घरगुती गॅस सिलिंडरचा अनेक ठिकाणी वापर करण्यात येतोय. त्यामुळे पुरवठा विभागाकडून अनेक ठिकाणी धाडी टाकण्यात येत आहेत. जालना आणि अंबडमध्ये पुरवठा विभागानं धाडी टाकून 43 गॅस सिलेंडर जप्त केले आहेत. अलीकडच्या दोन दिवसांत ही कारवाई करण्यात आली आहे. अंबडमध्ये 13 तर जालना शहरातील हॉटेल मधून 30 गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले आहेत.गॅस सिलेंडरच्या व्यावसायिक वापरासाठी निर्बंध घालण्यात आलेले असताना याव्यावसायिकांकडे गॅसचा साठा आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. तसेच, विदर्भातही घरगुती गॅस सिलिंडरमध्ये काळाबाजार झाल्याचं पाहायला मिळालं आहे, नागपूरच्या 6 जिल्ह्यात 163 गॅस वितरकांची झडती घेण्यात आली असून कारवाईत 110 गॅस सिलिंडर जप्त करण्यात आले आहेत. कारवाईत 5 जणांवर गुन्हा दाखल केला असून एकाला अटक करण्यात आलीय.

**तहसीलदारांकडून गॅस एजन्सीची तपासणी**

युद्धामुळे निर्माण झालेल्या गॅस सिलेंडर टंचाईचा वितरकासह कोणीही गैरफायदा घेऊ नये यासाठी शासकीय यंत्रणा अलर्ट मोडवर आल्या आहेत. तहसीलदारांनी भरारी पथक नेमले आहे हे पथक नांदगाव, मनमाड शहरासह तालुक्यातील गावखेड्यावर असलेली गॅस एजन्सी आणि गोडावूनला भेट देऊन त्यांच्याकडे किती ग्राहक असून सध्या किती सिलिंडर शिल्लक आहे याची तपासणी करत आहेत.

**गॅसचा तुटवडा आणि काळाबाजारावरून विरोधकांची सरकारवर टीका**

राज्यात निर्माण झालेला गॅसचा तुटवडा आणि काळाबाजारावरून विरोधकांनी सरकारवर टीका केलीय. राज्यात गॅसचा तुटवडा नाही अशी अफवा राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडून पसरवली जात असल्याची टीका संजय राऊत यांनी केलीय. दरम्यान विरोधकांच्या टीकेला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी देखील प्रत्युत्तर दिलंय. राज्यात अनेक शहरांमध्ये सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्यानं काळाबाजार देखील सुरू आहे. त्यामुळे पुरवठा विभागाकूडन ठिकठिकाणी धाडी टाकण्याचं काम सुरू आहे, तर दुसरीकडे याच गॅस तुटवड्यावरून विरोधक आणि सत्ताधाऱ्यांमध्ये आरोप-प्रत्यारोपाचा सामना रंगलाय.

### बिल्डरांनी केला २० टक्के कोटा गिळंकृत

## नाशिकमध्ये बनावट मोजणी नकाशांचा घोटाळा




■**मुंबई। प्रतिनिधी,**

आर्थिकदृष्ट्या दुर्बल व अल्प उत्पन्न गटातील नागरिकांचे घराचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या नाशिकमधील २० टक्के योजनेतील मोठा घोटाळा उघडकीस आला आहे. बनावट मोजणी नकाशे तयार करून ४९ जमीनदार आणि बिल्डरांनी २० टक्के योजनेतील घरे गिळंकृत केली आहेत. या विरोधात नाशिक शहरातील सरकारवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नगरविकास विभागाच्या अधिसूचनेनुसार ४ हजार चौरस मीटरपेक्षा जास्त क्षेत्रावर उभारल्या जाणाऱ्या गृहप्रकल्पांमध्ये २० टक्के जागा अत्यल्प आणि अल्प घटकांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. ही घरे दुर्बल घटकातील नागरिकांना वितरित करण्यासाठी म्हाडाकडे सुपूर्द करण्यात येतात. त्यानुसार म्हाडा लॉटरीच्या माध्यमातून ही घरे सर्वसामान्य नागरिकांना वितरित करते. मात्र हीच घरे गिळंकृत केल्याचा प्रकार घडला आहे. या प्रकरणी भूमी अभिलेख विभागाचे बिपीन काजळे यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

नगरविकास विभागाचा नियम टाळण्यासाठी काही जमीनमालक, बिल्डर आणि त्यांचे सहकारी संगनमताने जमिनीचे कागदोपत्री तुकडे करून क्षेत्र ४ हजार चौरस मीटरपेक्षा कमी दाखविलयाचा आरोप आहे. म्हाडाने या प्रकल्पात शंका उपस्थित केल्याने जिल्हाधिकारी नाशिक यांच्या आदेशानुसार स्थापन समितीने म्हसरूळ, गंगापूर आणि चेहडी या भागातील १०८ प्रकरणांची चौकशी केली. त्यापैकी ४९ प्रकरणांमध्ये प्रत्यक्ष मोजणी न करता मोजणी झाल्याचे दाखवून बनावट नकाशे तयार केल्याचे प्राथमिक तपासात समोर आले.

## गॅस बिलावरून गोंधळ... महानगर गॅस करणार ग्राहक मेळाव्याचे आयोजन

■**बदलापूर। प्रतिनिधी,**

घरगुती गॅसचा पुरवठा करणाऱ्या महानगर गॅस लिमिटेडविरोधात गुरुवारी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार गट) आणि बहुजन मुक्ती पार्टीतर्फे आंदोलन करण्यात आले. ग्राहकांना वाढीव गॅस बिले येत असून त्याकडे कंपनीकडून सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. या पार्श्वभूमीवर ग्राहकांच्या समस्या सोडवण्यासाठी लवकरच ग्राहक मेळावा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती महानगर गॅसच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांनी दिली.

सध्या युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती गॅसच्या पुरवठ्याबाबत देशभरात चर्चा सुरू आहे. व्यावसायिक गॅस सिलिंडरचा पुरवठा मर्यादित झाल्याने हॉटेल, केटरिंग व्यावसायिक आणि लग्नसमारंभाचे सभागृह व्यवस्थापक चिंतेत आहेत. मात्र घरगुती गॅसचा पुरवठा अखंडित ठेवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. महानगर गॅस लिमिटेडमार्फत बदलापूरमध्ये घरगुती पीएनजी (पाईपद्वारे गॅस) जोडणीद्वारे गॅस पुरवठा केला जातो. मात्र मागील काही दिवसांत ग्राहकांना वाढीव बिले येत असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात समोर आल्या आहेत. या तक्रारींचा योग्य निपटारा केला जात नसल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. तसेच तक्रार नोंदवण्यासाठी आलेल्या ग्राहकांना तासनतास थांबवून ठेवले जाते आणि त्यांना समाधानकारक उत्तरे दिली जात नाहीत, अशा तक्रारीही करण्यात आल्या.



**गॅस पुरवठ्यावर परिणाम नाही**

युद्धजन्य परिस्थितीमुळे घरगुती गॅस सिलिंडरबाबत राज्यभरात चर्चा सुरू असली तरी पीएनजी गॅसचा कोणताही तुटवडा नाही. महानगर गॅसचा पुरवठा अखंडित सुरू असून त्यात कोणताही खंड पडणार नाही. ग्राहकांनी चिंता करू नये, असेही जनसंपर्क अधिकारी नीरा अस्थाना यांनी स्पष्ट केले.

"ग्राहकांच्या तक्रारी सोडवण्यासाठी लवकरच बदलापूरमध्ये ग्राहक समस्या मेळावा आयोजित केला जाणार आहे. ग्राहकांना तक्रार नोंदवण्यासाठी विविध माध्यमे उपलब्ध असून तक्रार निवारण यंत्रणा आणखी बळकट करण्यात येईल."

-नीरा अस्थाना, जनसंपर्क अधिकारी महानगर गॅस

## स्वच्छ महाराष्ट्र अभियानात मोठा घोटाळा : विजय वडेट्टीवार

■**मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत १२ हजार कोटी रुपयांचा प्रचंड मोठा घोटाळा सुरू असून अधिकारी मंत्र्यांना अंधारात ठेवून सरकारी तिजोरी स्वच्छ करत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेसच्या विजय वडेट्टीवार यांनी शुक्रवारी विधानसभेत अर्थसंकल्पातील अनुदानाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होताना केला. या घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी करण्याची मागणीही त्यांनी केली.

विधानसभेत नगरविकास, सामाजिक न्याय, इतर मागास बहुजन कल्याण विभागसह पाच खात्यांच्या अनुदानाच्या मागण्या मंजूर करण्यात आल्या. तत्पूर्वी या चर्चेत सहभागी होताना वडेट्टीवार यांनी नगरविकास खात्याच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियानात



घोटाळा होत असल्याचा आरोप केला. कचऱ्याचे ढिग प्रत्यक्षात आहेत त्यापेक्षा जास्त दाखवून बनावट डीपीआर तयार केले जात आहेत. केवळ ३० टक्के काम करून १०० टक्के बिले लाटली जात असून अक्कलकोट, लातूर, पाचगणी यासारख्या शहरांत अधिकाऱ्यांनी चक्क आपल्या नातेवाईकांच्या नावे कंत्राटे घेतल्याचे समोर आल्याचे वडेट्टीवार म्हणाले.

**जनगणनेत ओबीसींचा वेगळा रकाना करावा**

केंद्र सरकारने जातनिहाय जनगणनेची घोषणा केली आहे, पण त्यात इतर मागासवगार्साठी (ओबीसी) रकाना नाही. ओबीसी जनगणना होणार अशी घोषणा असताना ओबीसीसाठी वेगळा रकाना नाही. ओबीसी लोकसंख्या किती आहे हे स्पष्ट झाले नाही तर त्यांना त्यांचे अधिकार मिळणार कसे? त्यामुळे राज्य सरकारने केंद्र सरकारकडे याबाबत पाठपुरावा करावा. केंद्राशी पत्रव्यवहार करून जनगणनेत ओबीसींचा वेगळा रकाना करण्याची मागणी करावी, अशी सूचना वडेट्टीवार यांनी केली.

**८५ टक्के विद्यार्थ्यांची ऑनलाइन प्रशिक्षणाकडे पाठ**

ओबीसींची संख्या ५० टक्के असताना महाज्योतीला ३०० कोटी आणि इतर संस्थांनाही ३०० कोटी, हे धोरण अन्यायकारक आहे. पीएचडी विद्यार्थ्यांनादेखील पाठ्यवेतन देण्यात आलेले नाही. ओबीसी विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण देण्यात येत आहे, पण विद्यार्थ्यांची मागणी ऑफलाइन प्रशिक्षणाची आहे. विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रति विद्यार्थी ५० हजार ते १ लाख रुपये खर्च केले जात आहेत. तरीही ८५ टक्के विद्यार्थ्यांनी ऑनलाइन प्रशिक्षणाकडे पाठ फिरवली आहे. हा पैसा केवळ संस्था चालवण्यासाठी खर्च होत आहे का, असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.

## 'गॅस अपडेट'च्या नावाने ऑनलाइन फसवणूक... कल्याण-डोंबिवलीत दोन महिलांना ४ लाखांचा गंडा

**एपीके फाईल डाउनलोड केली अन्...**

पोलिसांच्या माहितीनुसार, पीडित महिलांना एका अज्ञात व्यक्तीकडून फोन आला. त्या व्यक्तीने स्वतःला गॅस वितरण कंपनीचा प्रतिनिधी असल्याचे सांगितले. गॅस संबंधित माहिती अपडेट करण्याच्या नावाखाली त्याने महिलांना त्यांच्या मोबाईलवर एक एपीके फाईल डाउनलोड करून फॉर्म भरायला सांगितला. त्या महिलांनी सांगितलेल्या सूचनांनुसार फाईल डाउनलोड करून फॉर्म भरला. त्यानंतर, काही वेळातच त्यांच्या खात्यातून रक्कम गायब झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. ही रक्कम अंदाजे ४ लाख रुपये असल्याची माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांनी दिली. या प्रकरणी डोंबिवली पोलीस ठाण्यात ऑनलाइन आर्थिक फसवणुकीचे दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून आरोपींचा शोध सुरू आहे.





■**कल्याण। प्रतिनिधी,**

कल्याण-डोंबिवली परिसरात ऑनलाइन फसवणुकीचा प्रकार उघडकीस आला असून महानगर गॅस लिमिटेडचे कर्मचारी असल्याचे भासवून दोन महिलांची सुमारे ४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी डोंबिवली पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

**एलपीजी टंचाईच्या पार्श्वभूमीवर घडली घटना**

दरम्यान, मुंबई महानगर प्रदेशातील काही भागांमध्ये एलपीजी सिलिंडरची टंचाई निर्माण झाल्याच्या बातम्यांदरम्यान ही फसवणूक उघडकीस आली आहे.

नवी मुंबई आणि ठाणे परिसरात सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांना मोठ्या रांगा लावाव्या लागत आहेत. आज सकाळी सानपाडा परिसरात काही नागरिक पहाटे ३ वाजल्यापासून गॅस सिलिंडरसाठी रांगेत उभे असल्याचे दिसून आले.

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये गॅस एजन्सीबाहेर रिकामे सिलिंडर घेऊन मोठ्या प्रमाणात नागरिक रांगेत उभे असल्याचे दिसत आहे.

**हॉटेल उद्योगावरही परिणाम**

गॅस टंचाईचा परिणाम हॉटेल आणि रेस्टॉरंट व्यवसायावरही होत आहे. असोसिएशन ऑफ हॉटेल अँड रेस्टॉरंटचे अध्यक्ष विजय शेट्टी यांनी सांगितले की, शहरातील १६ हजार रेस्टॉरंटपैकी सुमारे २० टक्के रेस्टॉरंट्स मंगळवारपर्यंत बंद झाली होती, तर बुधवारी हा आकडा ३५ टक्क्यांपर्यंत वाढला.

तसेच, रायगड जिल्हा आणि नवी मुंबईतील २० टक्क्यांहून अधिक हॉटेल्सनी ११ मार्चपर्यंत कामकाज बंद केले, अशी माहिती समोर आली आहे.

हॉटेल व्यावसायिकांच्या मते, काही ठिकाणी गॅस सिलिंडर काळ्या बाजारात सुमारे ३,००० रुपयांपासून विकले जात आहेत, जे नेहमीच्या दरापेक्षा जास्त आहेत. हॉटेल संघटनांनी प्रशासनाला त्वरित गॅस पुरवठा सुरळीत करण्याची मागणी केली असून, अन्यथा हजारो कर्मचाऱ्यांच्या रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली आहे.

## अंगणवाडी सेविकेवर लैंगिक अत्याचाराचा आरोप

## हाणामारीत लेकीला वाचवण्यास गेलेल्या आईची हत्या

■**मुंबई। प्रतिनिधी,**

एका अंगणवाडी सेविकेवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याचा आरोप आहे. पीडितेच्या कुटुंबाला घटनेची माहिती मिळताच, परिस्थिती अचानकपणे तणावपूर्ण झाल्याचं चित्र निर्माण झालं. राग हा अंतिमक्षणी एका हिंसाचारापर्यंत पोहोचला. या धक्कादायक प्रकरणात एका महिलेची हत्या करण्यात आली. ही घटना मध्य प्रदेशातील शिवपुरी जिल्ह्यातील रनौड पोलीस स्टेशन परिसरात घडली.

घटनास्थळी एका तरुणाने अंगणवाडी सेविकेवर लैंगिक अत्याचार केला होता. पीडितेच्या कुटुंबीयांनी संताप व्यक्त करत थेट आरोपीचं घर गाठलं होतं. आरोपीच्या घरी पोहोचल्यानंतर त्याच्याकडून जाब विचारण्यास सुरुवात केली होती. दोघांमधील वाद वाढत गेला आणि काही वेळातच लाठीहल्ला करण्यात आला. या हल्ल्याने गावात एकच गोंधळ उडाल्याचं चित्र होतं, यादरम्यान घटनास्थळी लोक गोळा झाले होते.

या भांडणात आईने आपल्या मुलीला वाचवण्यासाठी मध्यस्ती केली असता, या हाणामारीत आईचा मृत्यू झाला. संबंधित माहिती गावात पसरली असता, गावात शोक व्यक्त केला जात आहे. संबंधित घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत, तरुणांविरुद्ध अंगणवाडी सेविकेवर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल केला होता.

संबंधित प्रकरणात आईच्या मृत्यूप्रकरणी पीडितेच्या कुटुंबातील पाच जणांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस संपूर्ण घटनेचा तपास करत असून पुढील कारवाई केली जाईल, असे पोलिसांचे म्हणणे आहे.



## लिफ्टच्या दरवाज्यात अडकला चिमुकलीचा हात... सीसीटीव्ही व्हिडिओ व्हायरल

■**पुणे। प्रतिनिधी,**

लिफ्टमध्ये लहान मुलांकडे थोडे दुर्लक्षही किती धोकादायक ठरू शकते, याचा धक्कादायक प्रकार पुण्यातील दिघी परिसरात समोर आला आहे. एका इमारतीत चिमुकलीचा हात लिफ्टच्या दरवाज्यात अडकल्याची घटना शनिवारी (दि.१४) समोर आली आहे. सुदैवाने उपस्थित नागरिकांच्या तत्परतेमुळे काही मिनिटांतच बाळाचा हात सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले असून या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. व्हायरल व्हिडीओनुसार ही घटना ७ मार्चला घडल्याचे समजते.

**लिफ्ट बंद होत असताना बाळाने दरवाजावर ठेवला हात**

व्हायरल व्हिडीओनुसार, एक महिला काही महिन्यांच्या बाळासह लिफ्टने वरच्या मजल्यावर जात होती. त्यावेळी लिफ्टमध्ये इतर काही महिला आणि काही पुरुषही उपस्थित होते. लिफ्टचा दरवाजा बंद होत असताना बाळाने नकळत दरवाजावर हात ठेवला. त्यावेळी बाळासोबत असलेल्या महिलेने चिमुकलीचा हात बाजूला केला.




**नागरिकांच्या प्रयत्नांमुळे टळला मोठा अपघात**

काही मिनिटांच्या प्रयत्नांनंतर अखेर चिमुकलीचा हात सुरक्षितपणे बाहेर काढण्यात यश येते. या घटनेत चिमुकलीला कोणतीही गंभीर दुखापत झाली नसल्याने उपस्थितांनी सुटकेचा निश्वास सोडला. ही संपूर्ण घटना इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून त्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.

**लिफ्टचा दरवाजा बंद झाला अन्...**

मात्र, काही क्षणानंतर चिमुकलीने पुन्हा एकदा दरवाजावर हात ठेवण्याचा प्रयत्न केला. दरम्यान लिफ्ट ठरलेल्या मजल्यावर पोहोचली आणि दरवाजा उघडला. त्यानंतर दरवाजा पुन्हा बंद होत असतानाच चिमुकलीचा हात दरवाजाच्या फटीत अडकला. हा प्रकार लक्षात येताच लिफ्टमधील सर्वजण घाबरले. एकीकडे बाळ वेदनेने रडत होते तर दुसरीकडे तिचा हात बाहेर काढण्यासाठी नागरिकांचे अथक प्रयत्न सुरु होते. मात्र सुरुवातीला हात सहज बाहेर आला नाही.

**लिफ्ट वापरताना मुलांकडे विशेष लक्ष देण्याचे आवाहन**

दरम्यान, या घटनेनंतर लिफ्टचा वापर करताना विशेषतः लहान मुलांसोबत अधिक सावधगिरी बाळगण्याची गरज असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे. तज्ज्ञांच्या मते, मुलांना लिफ्टच्या दरवाज्याजवळ, बटणांजवळ किंवा कडेला उभे राहू देऊ नये. क्षणिक दुर्लक्षही मोठ्या अपघातास कारणीभूत ठरू शकते, त्यामुळे पालकांनी मुलांसह लिफ्टचा वापर करताना विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.



# संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

## घोषणा सोपी, कृती अवघड

बंदीने समस्या संपते का? कायद्याने लादलेली बंदी जास्त प्रभावी असते, की समाजप्रबोधनाने विचारपूर्वक समूळ नष्ट केलेलं तिचं अस्तित्व? कारण, कायदा आला, की त्यामागून पळवाटा येतात. कायदा तर्कशुद्ध करण्याच्या गरजेतून इतके प्रश्न निर्माण होतात, की त्यात मूळ कायद्याची व्यवहार्यताच बऱ्याचदा संपून जाते. जी गोष्ट व्यवहार्य नसेल, तिची अंमलबजावणी कशी होणार? इथे तर संबंध थेट बालमनाशी आहे. वयाच्या सुरुवातीच्या वर्षात मुलांची वाढ नीट व्हावी यासाठी त्यांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचा विचार सर्वप्रथम ऑस्ट्रेलियात झाला. ऑस्ट्रेलियानंतर इंडोनेशियाने त्याची री ओढली. दक्षिण कोरिया, सिंगापूर, फ्रान्स, स्पेन या देशांनीही त्यासाठी वेगवेगळ्या उपायांचं सूतोवाच केल्यानंतर आता संपूर्ण युरोपच समान उपाययोजनेच्या शक्यतेचा विचार करतो आहे. जी समस्या साऱ्या जगाला सतावते आहे, ती भारतासमोर नाही, असं कसं होईल? भारतातील एकूण लोकसंख्या आणि त्या लोकसंख्येतील किशोर-तरुणांची मोठी संख्या या समस्येला इथे कितीतरी पटीने मोठी करते. भारतात या प्रश्नाला सर्वप्रथम वाचा फोडली, ती कर्नाटकाने. परदेशातील विचारमंथनाचा परिणामही असेल, पण कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी आपल्या राज्यात १६ वर्षांखालील मुलांना समाज माध्यमं वापरण्यावर बंदी आणण्याची घोषणा केली. आंध्रचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनीही लगेच १३ वर्षांखालील मुलांच्या समाज माध्यम वापरावर बंदीची घोषणा केली. 'तीन महिन्यांत ही बंदी लागू होईल' अशी त्यासाठीची कालमयार्दाही त्यांनी जाहीर करून टाकली. या दोन राज्यांनंतर बिहारचे मावळते मुख्यमंत्री नितीशकुमार आणि आत्ताच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही 'आपलाही तसा विचार सुरू असल्या'चं बोलून दाखवलं. मुलांचा 'स्क्रीन टाईम' कमी करण्याची गरज जगभर कशी समान पद्धतीने जाणवते आहे, ते या सगळ्या घोषणांवरून दिसतं. कर्नाटक आणि आंध्र प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी थेट बंदीचीच घोषणा केली असली, तरी ही बंदी नेमकी कशी प्रत्यक्षात आणणार, ते अद्याप स्पष्ट केलेलं नाही. कारण, डिजिटल जगात कोणतीही बंदी आणणं आणि तिची यशस्वी अंमलबजावणी करणं मोठं जिकिरीचं असतं. सरकारने आपली पूर्ण ताकद लावल्याशिवाय आणि देशाबाहेरून चालवण्या जाणाऱ्या प्लॅटफॉर्मचं सहकार्य मिळवल्याशिवाय अशी कुठलीही बंदी शक्य होत नाही, हा या पूर्वीचा अनुभव आहे. बंदीची घोषणा जितकी सोपी आणि आकर्षक, तेवढीच तिची अंमलबजावणी कठीण असते! यापूर्वी जगभर अनेकदा विचारला गेलेला प्रश्न यानिमित्ताने पुन्हा विचारला जातो आहे : बंदीने समस्या संपते का? कायद्याने लादलेली बंदी जास्त प्रभावी असते, की समाजप्रबोधनाने विचारपूर्वक समूळ नष्ट केलेलं तिचं अस्तित्व? कारण, कायदा आला, की त्यामागून पळवाटा येतात. कायदा तर्कशुद्ध करण्याच्या गरजेतून इतके प्रश्न निर्माण होतात, की त्यात मूळ कायद्याची व्यवहार्यताच बऱ्याचदा संपून जाते. जी गोष्ट व्यवहार्य नसेल, तिची अंमलबजावणी कशी होणार? इथे तर संबंध थेट बालमनाशी आहे. दुसऱ्या बाजूला तंत्रज्ञान आहे. माहिती तंत्रज्ञान इतक्या झपाट्याने नवनव्या गोष्टी येत आहेत, तंत्रज्ञान इतक्या वेगाने प्रगत होत आहे, की कोणीही म्हटलं तरी या तंत्रज्ञानाला आपल्या पकडीत ठेवून थांबवू शकणार नाही. यासंदर्भात याआधीही काही प्रयोग झाले आहेत. विशेषतः मुक्त लैंगिक आणि अश्लील चित्रफिती दाखवणाऱ्या डिजिटल प्लॅटफॉर्मसंदर्भात. आजही ओटीटीवरील अनेक वेब सिरीज, चित्रपट प्रौढांसाठी असतात. ते पाहण्यासाठी तिथे गेलं, की दर्शकाला आधी त्याचं वय विचारलं जातं. दर्शकाने सोयीनुसार आपलं वय नोंदवलं, की त्या 'प्लॅटफॉर्म'ची सगळी दारं दर्शकासाठी क्षणात खुली होतात. दर्शकाने टाकलेलं त्याचं वय खरं, की खोटं हे तपासण्याची कुठलीही सोय तिथे नाही. त्यामुळे, आजही अडसर आहे; पण तो अगदी सहजपणे बाजूला करता येईल असाच ठेवला आहे. ज्या राज्य सरकारांनी आता बंदीची घोषणा केली आहे, त्यांना या बाबी लक्षात घेऊन सहजासहजी दूर करता येणार नाही, असा अडसर घालावा लागेल! हे 'प्लॅटफॉर्म' उघडण्यासाठी असणारी व्यवस्था आधार कार्डाशी जोडण्यासारख्या पर्यायांचा विचार केला, तरच ही बंदी खऱ्या अर्थाने अमलात येईल. अर्थात यालाही 'डार्क वेब' किंवा 'व्ही पी एन' सारखे आडमार्ग आहेतच. माहिती तंत्रज्ञान, संगणक, इंटरनेट हे या पिढीचंच तंत्रज्ञान आहे. पंधरा-वीस वर्षांची मुलं त्यात इतकी तरबेज असतात, की त्यांना सगळ्या पळवाटा, चोरवाटा फार पटकन सापडतात. जे बंदीचा खरंच गांभीर्याने विचार करत आहेत, त्यांना त्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायद्याचाच आधार घ्यावा लागणार आहे. हा कायदा केंद्र सरकारच्या आखत्यारीत आहे. त्यामुळे, राज्य सरकारची कितीही इच्छा असली, तरी ते अशी राज्यापुरती बंदी आणू शकतील का, आणि ती उपयोगी असेल का, हा प्रश्न आहे. त्यांच्या राज्यातली मुलं काही कारणाने अन्य राज्यात गेली, तर किंवा अगदी सीमा भागातल्या मुलांचा यासंदर्भात कसा विचार होणार? असेही प्रश्न आहेत. ज्यांनी घोषणा केल्या आहेत, त्यांचा विचार योग्यच आहे. भावनाही सच्ची असेल, तर त्यांनी एकत्रितपणे केंद्राला साकडं घातलं, तर ते जास्त उपयोगाचं ठरेल. इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या भारतात ९६ कोटींपेक्षा अधिक आहे. त्यातले ६६% पेक्षा अधिक वापरकर्ते समाज माध्यमांचा नियमित वापर करतात. इंटरनेट स्वस्तात उपलब्ध असल्याने आणि आता नेटवर्कही भक्कम झाल्याने खेड्यापाड्यात इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्या वाढते आहे. यात मुलांची संख्या खूप जास्त आहे. एका अंदाजानुसार, २५% मुलं इंटरनेटचा मुबलक वापर करत असतात. हा वापर मुख्यतः रील पाहण्यासाठी होतो. आपल्या 'प्लॅटफॉर्म'वर आलेल्या प्रत्येक दर्शकाला (म्हणजे ग्राहकाला) आपल्या 'प्लॅटफॉर्म'वर जास्तीत जास्त वेळ कसं गुंतवून ठेवता येईल, यासाठी सर्व 'प्लॅटफॉर्म' चालकांची धडपड असते. त्यासाठी ते अत्यंत विचारपूर्वक कार्यक्रमांची निर्मिती करत असतात. त्यामुळे, उद्या या 'प्लॅटफॉर्म'वरील आक्षेपार्ह कार्यक्रमांवर नियंत्रण आणायचं ठरलंच, तर या निर्मितीप्रक्रियेत हस्तक्षेप करता येईल, अशी यंत्रणा उभी करावी लागेल. या यंत्रणेला त्या 'प्लॅटफॉर्म' च्या अल्गोरीदमची प्रक्रिया गरजेनुसार समजून घेण्याचे अधिकारही द्यावे लागतील. अशा आणखीही अनेक गोष्टी आहेत. त्या प्रसंगाप्रसंगाने चर्चेत येतीलच. समस्या गंभीर असली, त्यावर उपायाची तातडीने गरज असली, तरी असा उपाय करणं वाटतं तितकं सोपं नाही, हाच याचा अर्थ.

# मुंबई-गोवा महामार्गासाठी तारीख पे तारीख!



कोर्टाची पायरी चढल्यानंतर बरेचदा जसे तारीख पे तारीखचा अनुभव येतो, तसाच अनुभव किंबहुना त्यापेक्षा अत्यंत कटू अनुभव कोकणवासीयांना दीड दशकापासून येत आहे. मुंबई-गोवा महामार्गाचे किती काम झाले आहे, हे अजून कुणीही ठामपणे सांगत नाही आणि डेडलाईन वाढत जात आहे. आताही विधानपरिषदेत यावर प्रश्न विचारला असता सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी जुलै 2027 ती नवी तारीख दिली आहे. त्यामुळे डिसेंबर 2026 च्या डेडलाईनचे काय झाले, या प्रश्नाला आता काहीही अर्थ उरलेला नाही.

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग म्हणजे कोकणवासीयांची दुखरी नस आहे. आज ना उद्या हा महामार्ग पूर्ण होणार, आमचा प्रवास आनंदाचा होणार, पर्यटनाला आणखी अच्छे दिन येणार, ही आणि अशी अनेक स्वप्नं पाहणाऱ्या कोकणवासीयांची एक पिढी आता या प्रवासात मोडलेल्या हाडांची गणना करत आहे. त्यांच्या दुसऱ्या पिढीला मुंबई-गोवा महामार्गाच्या पूर्ततेचे वेध लागले आहेत. मात्र, तीन-चार वर्षांपासून कामाचे गणित, वेळेची डेडलाईन आणि मंत्र्यांची आश्वासने यांचा एकमेकांशी काहीही संबंध राहिलेला नाही. त्यामुळे खरंच हा महामार्ग पूर्ण होणार आहे का, असा प्रश्न पुन्हा एकदा विचारला जात आहे. यावेळी यासाठी निमित्त ठरले आहे ते सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्या उत्तराचे. विधान परिषदेत हाच प्रश्न विचारला गेला आणि मंत्र्यांनी नेहमीसारखे उत्तर दिले. प्रश्नही सत्ताधाऱ्यांचा उत्तरही सत्ताधाऱ्यांचे म्हणजे कोकणवासीयांनाही वाटेल, बघा यांना आमची किती काळजी वाटते आहे. मात्र, मंत्र्यांच्या उत्तराने एक बाब स्पष्ट झाली. डिसेंबर 2026 ची डेडलाईन चुकली आहे. आता जुलै 2027 ची नवी डेडलाईन देण्यात आली आहे. थोडक्यात सांगायचे तर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण होण्यास आणखी 16 महिने लागणार आहेत. आता यातून कोकणवासीयांनी काय बोध घ्यायचा तो घ्यावा!

मुंबई-गोवा महामार्गाचे किती टक्के काम पूर्ण झाले, यातही अनेकदा तफावत आढळली आहे. गेल्या वर्षी जुलै 2025 मध्ये सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी मुंबई-गोवा महामार्गाचा दौरा करत कामाचा आढावा घेतला होता. तेव्हा 90 ते 95 टक्के कामे पूर्ण झाले असून काही महत्त्वाची कामे खोळंबल्याने एक वर्षात सर्व कामे पूर्ण होतील, असे त्यांनी स्पष्ट केले होते. तसेच डिसेंबर 2026 पर्यंत संपूर्ण महामार्ग वाहतुकीसाठी खुला होईल, असेही मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले म्हणाले होते. गंमत म्हणजे त्यानंतर सहा महिन्यांनी म्हणजे डिसेंबर 2025 मध्ये केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी लोकसभेत मुंबई-गोवा महामार्गाबाबत माहिती देताना 2009 पासून मुंबई-गोवा महामार्गाचा प्रकल्प रेंगाळल्याची कबुली दिली तसेच 89 टक्के काम पूर्ण झाले असून एप्रिल 2026 पूर्वी मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण होईल, अशी ग्वाही सभागृहात दिली होती. राज्यातील आणि केंद्रातील मंत्र्यांनी कामाच्या टक्केवारीबाबत दिलेल्या माहितीत तसेच डेडलाईनबाबतची तफावत खूप काही सांगून जाते. यातून काय अर्थ काढायचा असे ठरवले तर राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात या महामार्गाबाबत संवादाचा अभाव आहे का? कोकणातील लोकप्रतिनिधींना या महामार्गाबाबत गांभीर्य आहे का? महामार्ग पूर्णत्वाबाबत नेहमी डेडलाईन का बदलली जाते? कंत्राटदार कामे सोडून जातात हे कारण दिले जाते, पण कंत्राटदार कामे का सोडतात, याचे उत्तर का दिले जात नाही? मुळात मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण व्हावा, कोकणवासीयांचा प्रवास सुखाचा आणि अपघातरहित व्हावा, ही लोकप्रतिनिधींची राजकीय इच्छाशक्ती कुठे लोप पावली? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

मुंबई-गोवा महामार्गावर रायगड जिल्ह्यात माणगाव आणि इंदापूर हे दोन्ही हॉटस्पॉट आहेत. या दोन्ही ठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होते. अनेकदा माणगावजवळ वाहतूक कोंडीमुळे दोन-तीन तासांचा खोळंबा होणार, हे आता चालक आणि प्रवाशांनी गृहीत धरलेले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे बाह्यवळणाचे (बायपास) काम रखडले आहे. इंदापूर आणि माणगाव बाह्यवळण मार्गासह दोन मोठे पूल आणि तीन रेल्वे उड्डाणपुलांमुळे हे काम रेंगाळले आहे. कधी जमीन संपादनात अडचणी, कधी कंत्राटदारांनी काम मिळवल्यानंतर त्यात लक्ष न घालणे यामुळे माणगाव आणि इंदापूरमधील कामे रेंगाळली आहेत. आता मंत्रिमहोदयांनी सभागृहात सांगितले आहे की, माणगाव आणि इंदापूर बाह्यवळण मार्गासह तीन रेल्वे उड्डाणपूल आणि दोन मोठ्या पुलांची कामे जुलै 2025 मध्ये सुरू करण्यात आली असून त्यांना कामे पूर्ण करण्यासाठी जुलै 2027 ची डेडलाईन देण्यात आली आहे. याचाच अर्थ संपूर्ण मुंबई-गोवा महामार्ग जुलै 2027 पर्यंत सुरू होणे शक्य नाही.

मुंबई-गोवा महामार्ग अपूर्णत्वाचे शुक्लकाष्ट केव्हा दूर होणार, हे आता विधात्यालाही सांगता येणार नाही, असे दिसते. मुळात मुंबई ते गोवा मार्ग दुपदरी होता. यूपीए सरकारने या महामार्गाचे रुंदीकरण करून तो चौपदरी करण्याचा निर्णय घेतला. ते वर्ष 2007 होते. या चौपदरीकरणामुळे तळकोकणापर्यंतचा प्रवास 12 तासांवरून 7 तासांवर येणार होता. हा महामार्ग दुपदरी असताना रस्त्याच्या दोन्ही बाजूंना हिरवीगार झाडी होती. मोठमोठी वृक्ष होती. 2010 पर्यंत या महामार्गाच्या कामाला सुरुवात झाली नव्हती. तब्बल 471 किलोमीटरच्या मुंबई-गोवा महामार्गाच्या कामाला 2012 मध्ये सुरुवात झाली. जमिनींचा तंटा, कनाळ्ळ अभयारण्यातून मार्ग काढण्यासाठी झालेली कोर्टकचेरी, कंत्राटदारांकडून होणारी दिरंगाई आणि कोकणातील लोकप्रतिनिधींनी सरकारवर एकत्रित दबाव न टाकल्यामुळे महामार्गाच्या कामात प्रचंड दिरंगाई झाली. परिणामी मुंबई-गोवा महामार्ग प्रकल्पाचा खर्च साडेसात हजार कोटींवरून 15 हजार कोटींवर गेला. आतातर या खर्चात आणखी वाढ झाली असावी. एवढे होऊनही मुंबई-गोवा महामार्गाचे काम अपूर्णच आहे. आता सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले म्हणतात, या महामार्गावरील प्रलंबित कामांना वेग देण्यात आला आहे. माणगाव आणि इंदापूर बाह्यवळणाची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. त्यामुळे माणगाव आणि इंदापूर बाह्यवळण वगळता उर्वरित मुंबई-गोवा महामार्ग (राष्ट्रीय महामार्ग 66) मे 2026 पर्यंत पूर्ण होईल. यावर कोकणवासीयांना विश्वास ठेवण्याशिवाय पर्याय नाही, हेही आता लक्षात घ्यायला हवे.

मुंबई-गोवा हा शापित महामार्ग बनला आहे. एवढा सिमेंट काँक्रिटचा रस्ता असूनही अनेक ठिकाणी मोठ्या भेगा पडल्याच्या बातम्या अनेक वेळा झळकल्या आहेत. त्यामुळे महामार्ग पूर्ण झाला तरी याचे काम किती दर्जेदार असेल, हे येणारा काळ सांगेल. खड्डे तर पाचवीलाच पूजले आहेत. महामार्गावर अपघातांची मालिका सुरू असते. आता एवढा मोठा महामार्ग असून मोठी दुर्घटना झाली तर त्यासाठी ट्रॉमा सेंटर उभारल्याचे कधी चर्चेत आले नाही. आजही मोठ्या दुर्घटनेनंतर गंभीर अवस्थेतील रुग्णांना कामोठे किंवा मुंबईतील रुग्णालयांत न्यावे लागते, हे रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांतील लोकप्रतिनिधींचे अपयश म्हणावे लागेल. अत्याधुनिक सुविधा असलेली रुग्णालये या महामार्गालगत उभारावीत, अशी इच्छाही कुणी राजकीय नेत्यांनी व्यक्त केलेली नाही, ही कोकणाची शोकांतिका आहे. श्रीरामाने 14 वर्षांचा वनवास भोगला आणि याच वनवासाच्या काळात रामेश्वरम ते श्रीलंका असा रामसेतू बांधला आणि तोही वानरसेनेच्या मदतीने. आता 21 वे शतक आहे. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. तरीही 16-17 वर्षांपासून मुंबई-गोवा महामार्गाचे काम रखडलेलेच आहे. कोकणात जाणाऱ्या खासगी गाड्या किंवा वाहनाने कोकणात जाणारे आजही मुंबईहून एक्स्प्रेस-वेने कोल्हापूरमार्गे जातात. त्यासाठी टोलचा मोठा भुर्दंड ते सहन करतात. त्यावर मलमपट्टी करण्यासाठी गणेशोत्सव काळात कोकणात जाणाऱ्या गाड्यांना टोलमाफीची घोषणा करून सरकार स्वतःचे अपयश झाकण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे कोकणवासीयांच्या खडतर प्रवासाला किमान जुलै 2027 मध्ये तरी ब्रेक लागणार का, की तेव्हा नव्या डेडलाईनची घोषणा करणार? थोडक्यात काम करायचे आहे म्हणून सुरू आहे, कोकणासाठी किती केले हे दाखवयाचे म्हणून खर्च मोठ्या प्रमाणात केला जात आहे, तरीही काम अपूर्णच आणि लोकांची गैरसोय तसेच त्यांचा वाढणारा मनस्ताप म्हणजे मुंबई-गोवा महामार्ग, असे याचे थोडक्यात वर्णन करता येईल.

# 'इच्छा' मरणाने सुटका

**माजी मंत्री सदानंद वर्दे यांनी दोन दशकांपूर्वी राज्याच्या विधीमंडळात याबाबत पाठपुरावासुद्धा केला. मात्र, स्पष्ट तरतुदींअभावी मुंबईतील मरणासन्न अवस्थेतील अरुणा शानबागसारख्या अनेक प्रकरणांमध्ये जीवन संपवण्यास मान्यता मिळू शकली नाही.**



गेली १२ वर्षे 'कोमा'त असलेल्या हरीश राणाला इच्छामरण देण्यास कायदेशीर मान्यता देऊन सर्वोच्च न्यायालयाने एका जटिल; परंतु संवेदनशील विषयाबाबत दिशादर्शक निकाल दिला आहे. न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. के. व्ही. विश्वनाथन यांनी दिलेल्या या निकालाद्वारे देशात प्रथमच इच्छामरणास कायदेशीर परवानगी मिळाली; त्याबरोबरच या संदर्भात सर्वसमावेशक कायदा करण्याबाबत केंद्र सरकारला केलेली सूचनाही महत्त्वाची आहे. असाध्य आजार आणि असह्य वेदनांना तोंड देत 'जगण्यापेक्षा मरण परवडले,' अशी इच्छा अनेकदा भावनेच्या भरात व्यक्त केली जाते. मात्र, अशा इच्छामरणाला कायदेशीर परवानगी मिळण्यावरून सर्व स्तरांमध्ये विचारांचे काहूर निर्माण होणे साहजिक आहे; कारण या विषयाला नैतिक, धार्मिक, सामाजिक आणि कायदेशीर असे अनेक पैलू आहेत.

अपघातामध्ये जायबंदी झालेला हरीश राणा हा तरुण गेली अनेक वर्षे मरणप्राय जीवन जगत होता. त्याच्यावरील उपचारांच्या खचापीटी त्याच्या कुटुंबीयांना घरदार विकण्याची वेळ आली होती. तो बरा होणार नाही, असे उपचार करणाऱ्या डॉक्टरांनीही स्पष्ट केले होते. परिस्थिती हाताबाहेर गेल्यानंतर त्याच्यावरील उपचार थांबवण्याची परवानगी देण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली होती. त्या पार्श्वभूमीवर 'निष्क्रिय इच्छामरणा'ला, म्हणजे उपचार थांबवून 'सन्मानाने निरोप' देण्यास मान्यता देताना न्यायमूर्तींनाही अश्रू अनावर झाले. तो बरा होऊ शकत नाही, या वैद्यकीय मंडळाने दिलेल्या मताचा परामर्ष घेऊन आणि घटनेतील तरतुदींचा अन्वयार्थ लावून न्यायालयाने दिलेला निकाल इच्छामरणाची चर्चा एक पाऊल पुढे नेणारा आणि त्यातील कायदेशीर गुंतागुंतीमध्ये काही प्रमाणात स्पष्टता आणणारा म्हणावा लागेल.

अनेक देशांत अशा प्रकरणांमध्ये औषध देऊन मृत्यू देणाऱ्या 'सक्रिय इच्छामरणा'स (ॲक्टिव्ह युथेनेशिया) भारतात कायद्याची संमती नाही. छळवादी ठरलेल्या जगण्यापासून सुटका व्हावी, असा एक मतप्रवाह समाजात पूर्वीपासून आहे. मात्र, अनेक धर्मांमध्ये 'कोणीही व्यक्ती कोणत्याही परिस्थितीत एखाद्या निष्पाप व्यक्तिला मारण्याची परवानगी देऊ शकत नाही,' अशी दृढ धारणा आहे. त्यामध्ये स्वतःच्या मृत्यूचा उद्देशही स्वतःची हत्या केल्यासारखाच मानला जातो; तसेच पोटातील गर्भाचीही त्यात समावेश होतो. याच भावनेतून अमेरिकेत गर्भपातालाही विरोध होत आहे. स्वित्झर्लंड, जर्मनी, ऑस्ट्रिया आणि अमेरिकेतील काही राज्यांमध्ये सक्रिय इच्छामरणास कायदेशीर मान्यता आहे. इच्छामरणाबाबत जगभरात आणि भारतातही अनेकदा चर्चा झाल्या, या विषयावर अनेक चर्चा-चळवळी आणि याचिकाही झाल्या आहेत.

अनेकदा रुग्णालयांमध्ये कुटुंबीयांच्या संमतीने व्हेंटिलेटर बंद करण्यासारख्या कृतीचा आजही अवलंब होतो; तसेच काही धर्मीयांमध्येही अन्नत्यागासारख्या प्रथा आहेत. मात्र, त्यांना कायद्याची स्पष्ट चौकट नाही. सन २०१८ मध्ये 'कॉमन कॉज' प्रकरणात 'सन्मानाने मरण्याचा अधिकार, हा घटनेच्या २१व्या कलमाने दिलेल्या सन्मानाने जगण्याच्या अधिकाराचाच एक भाग आहे,' हे मूलभूत तत्त्व न्यायालयाने मान्य केले होते. त्यानुसार ज्यांचे प्राण फक्त बाह्य उपचारांवर अवलंबून आहेत, त्यांचे कृत्रिमरीत्या आयुष्य वाढवणारे उपचार थांबविण्याचा 'निष्क्रिय इच्छामरणा'चा मार्ग कायद्याच्या चौकटीत बसणारा ठरला. काही वर्षांपूर्वी मृत्यूसंदभार्तील इच्छापत्र (लिव्हिंग विल) करण्याची तरतूदही पुढे आली. त्यामध्ये आपल्यावर कोणते व कितपत उपचार करावे, याबाबतची इच्छा नोंदविली जाते. त्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या ताज्या निकालातून काही तांत्रिक बाबींमध्ये स्पष्टता आली आहे.

अर्थात, या निकालानंतर इच्छामरणाची परवानगी आता सहजी मिळेल, अशी परिस्थिती नाही. मृत्यू हे अटळ सत्य असल्याचे प्रत्येकास पक्के ठाऊक असले, तरी यावर खुलेपणाने चर्चा होत नाही. आपला मृत्यू वेदनारहित व्हावा, अंथरुणाला खिळून खितपत पडावे लागू नये, कुटुंबीयांना त्रास-खर्च होऊ नये, असे प्रत्येकाला वाटणे साहजिक आहे.

गेल्या काही काळात आधुनिक आरोग्यसुविधांमुळे आयुष्यमानही वाढले आहे. मात्र, हा वेदनारहित-सन्मानजनक मृत्यू प्रत्येकाच्याच वाट्याला येईल, असे नाही. त्यामुळेच इच्छामरणाच्या पर्यायावर चर्चा होते. अर्थात, न्यायालयाने सूचना केली असली, तरी या विषयाची संवेदनशीलता पाहता सरकार असा कायदा लगेच करेल की नाही, हे आताच सांगता येणार नाही. गेल्या शतकात अमेरिकेत ही पद्धत सुरू झाली, तेव्हा वृद्ध किंवा अपंगांचे जीवन संपवण्यासाठी त्याचा गैरवापर झाला; असे प्रकार टाळण्यासाठी संभाव्य कायद्यातील पळवाटा रोखण्याच्या कठोर तरतुदी करणे अत्यावश्यक आहे. एकंदरीत नैतिक, कायदेशीर आणि व्यावहारिक पैलूंचा अभ्यास करून या विषयात पुढे गेले पाहिजे.

# अघोषित आघाडीने का सोडले?



अमेरिका आणि इस्त्रायल यांनी इराणवर थेट हल्ला केल्याने रशिया आणि चीन आक्रमक होतील, अशी चिन्हे होती. प्रत्यक्षात या दोन्ही देशांनी इराणला बळ देण्यास असमर्थता दर्शवली आहे. ती का? त्यामागे काय रणनीती आहे?

पश्चिम आशियातील भूराजकीय समीकरणे सध्या अत्यंत नाजूक वळणावर आहेत. अमेरिका आणि इस्त्रायलने इराणवर केलेल्या भीषण हवाई हल्ल्यांनंतर संपूर्ण जगाचे लक्ष इराणचे मित्र मानले जाणाऱ्या रशिया आणि चीनकडे लागले होते. रशिया, चीन, इराण आणि उत्तर कोरिया या देशांनी मिळून लोकशाहीवादी पाश्चिमात्य जगाविरुद्ध एक 'अघोषित आघाडी' (चीन, रशिया, उत्तर कोरिया यांची क्रिंक आघाडी) उघडल्याची चर्चा गेल्या काही वर्षांपासून सुरू होती. मात्र, जेव्हा प्रत्यक्ष इराणवर अस्तित्वाचे संकट ओढवले, तेव्हा या मित्रराष्ट्रांनी घेतलेली भूमिका ही केवळ मैत्रीच्या पलीकडे जाणारी आणि स्वार्थावर आधारित असल्याचे स्पष्ट झाले. इराणला वाचवण्यासाठी रशिया आणि चीन लष्करी मैदानात का उतरले नाहीत, याचे विश्लेषण कार्नेगी रशिया युरेशिया सेंटरच्या ताज्या संशोधन अहवालात आहे. गेल्या काही दिवसांत अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यांनी तेहरानमधील सत्ता डळमळीत केली. अशा वेळी इराणला आपल्या सामरिक भागीदारांकडून मोठ्या मदतीची अपेक्षा होती. रशिया आणि इराणमधील संबंध युक्रेन युद्धाच्या पार्श्वभूमीवर अधिक घट्ट झाले होते. इराणने रशियाला चार अब्ज डॉलरचे 'शाहेद' ड्रोन पुरवले, त्या बदल्यात रशियाने प्रगत हेलिकॉप्टर्स आणि रायफल्स इराणला दिल्या. दुसरीकडे, चीनने २०२१ मध्ये इराणसोबत केलेल्या २५ वर्षांच्या धोरणात्मक करारानुसार ४०० अब्ज डॉलरच्या गुंतवणुकीचे आश्वासन दिले होते. शांघाय सहकार्य संघटना (एससीओ) आणि ब्रिक्समध्ये इराणचा समावेश करून रशिया-चीनने त्याला जागतिक व्यासपीठ मिळवून दिले. परंतु, प्रत्यक्ष युद्धाच्या ठिणगीनंतर या दोन्ही महासत्तांनी केवळ अमेरिकेवर शाब्दिक टीका करण्यापलीकडे काहीही केलेले नाही. विश्लेषकांच्या मते यामागे केवळ राजनैतिक कारणे नसून जागतिक शक्तिसंतुलनातील सूक्ष्म आणि व्यावहारिक गणित दडलेले आहे. युक्रेन युद्धात गुंतलेल्या रशियाची संपूर्ण लष्करी ताकद, प्रगत एस-४०० क्षेपणास्त्र प्रणाली आणि हवाई दल सध्या युक्रेनच्या सीमेवर अडकले आहेत. स्व अस्तित्वाच्या लढाईत गुंतलेला रशिया इराणसाठी आपली संसाधने खर्च करण्याच्या स्थितीत नाही. त्यातच, रशिया सध्या अमेरिकेसोबत काही गुप्त वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करत आहे. मध्यपूर्वेतील संघर्षात थेट उतरल्यास या वाटाघाटी फिसकटण्याची भीती मॉस्कोला वाटते. इराणला केवळ गुप्तचर माहिती पुरवून रशियाने आपली मैत्री निभावण्याचा प्रयत्न केला असला तरी ती इराणला वाचवण्यासाठी पुरेशी नाही. तसेच, रशियाचे मध्यपूर्वेतील इतर देशांशीही महत्त्वाचे आर्थिक आणि राजनैतिक संबंध आहेत. सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती यांसारख्या देशांशी ऊर्जा क्षेत्रातील सहकार्य वाढवण्याचा प्रयत्न रशिया करत आहे. अशा वेळी इराणसाठी थेट लष्करी हस्तक्षेप केल्यास त्या संबंधांवर परिणाम होण्याची शक्यता आहे. चीन हा अमेरिकेची जागा घेईल, अशी शक्यता वर्तवली जात होती. पण चीनची कार्यपद्धती अमेरिकेपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. चीनने कधीही कोणाला सुरक्षा हमी दिलेली नाही. बीजिंगच्या शब्दकोशात मित्रापेक्षा 'धोरणात्मक भागीदार' असा शब्दप्रयोग अधिक असतो. चीनसाठी इराण हा ऊर्जेचा एकमेव स्रोत नाही. सौदी अरेबिया आणि संयुक्त अरब अमिराती यांसारख्या इराणच्या प्रतिस्पर्धी देशांशी चीनचे आर्थिक संबंध अधिक व्यापक आहेत. सौदी अरेबिया चीनला इराणपेक्षा जास्त तेल पुरवठा करतो. चीन आणि अरब राष्ट्रांमधील व्यापार हा इराणच्या तुलनेत दहापट मोठा आहे. जर चीनने इराणची लष्करी बाजू घेतली असती, तर त्याचे इतर अरब देशांशी असलेले अब्जावधी डॉलरचे प्रकल्प धोक्यात आले असते. थोडक्यात, चीनला इराणमधील सत्तेपेक्षा आपल्या व्यापाराची अधिक काळजी आहे. चीनचे परराष्ट्र धोरण प्रामुख्याने आर्थिक हितसंबंधांवर आधारित असते. चीनला मध्यपूर्वेत स्थैर्य हवे असते, कारण या प्रदेशातून त्याला मोठ्या प्रमाणात ऊर्जा पुरवठा मिळतो. विश्लेषकांच्या मते, चीन पारंपरिक पद्धतीने मित्र देशासाठी युद्धात उतरण्याच्या अमेरिकन भूमिकेऐवजी तो विविध देशांशी संबंध ठेवून संतुलन साधण्याचा प्रयत्न करतो. इराणसोबत चीनचे धोरणात्मक सहकार्य असले तरी त्याने अनेकदा थेट लष्करी मदत टाळली आहे. २०१५ च्या अणुकराराच्या काळात चीनने संयुक्त राष्ट्रांच्या निर्बंधांनाही पाठिंबा दिला होता. म्हणूनच इराणवरील हल्ल्यानंतर चीनने तीव्र शब्दांत टीका केली असली तरी प्रत्यक्ष लष्करी मदत करण्यापासून तो दूर राहिला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांचा पुढील महिन्यात चीन दौरा प्रस्तावित आहे. जवळपास दशकानंतर अमेरिकन राष्ट्राध्यक्ष चीनला भेट देणार आहेत. अशा वेळी इराणच्या मुद्द्यावरून अमेरिकेशी आणखी संबंध बिघडू शकतात. ट्रम्प यांच्या संभाव्य व्यापार युद्धापासून स्वतःला वाचवणे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम राहणे यास चीनचे प्राधान्य आहे. तसेच दुर्मिळ खनिजे आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्याच्या प्रयत्नात चीन आहे. इराणसाठी या मोठ्या उद्दिष्टांना खीळ बसवणे चीनला मुळीच मान्य नाही. चीनचे धोरण हे अत्यंत दूरदृष्टीचे आणि व्यवहार्य आहे. जर इराणमधील सत्ता बदलली, तरीही नवीन येणाऱ्या सरकारला चीनशी व्यापार करावाच लागेल, कारण चीन हा इराणी तेलाचा मोठा खरेदीदार आहे. इराणकडे पर्याय नाहीत, पण चीनकडे रशियासारखे इतर तेल पुरवठादार उपलब्ध आहेत. त्यामुळे इराण उद्ध्वस्त झाला तरी चीनचे आर्थिक नुकसान मर्यादितच राहील. पश्चिम आशियातील संघर्षाचा सर्वात मोठा परिणाम ऊर्जा बाजारावर होत आहे. इराणमधील संघर्षामुळे तेलाच्या किमती वाढत आहेत. याचा फायदा रशियाला होत असल्याचेही काही अहवाल सांगतात. ऊर्जा पुरवठ्यातील अडचणीमुळे चीनने रशियाकडून अधिक तेल आयात करण्याची शक्यता वाढली आहे. म्हणजेच या संघर्षातून चीन आणि रशिया दोघांनाही काही आर्थिक फायदे मिळू शकतात. त्यामुळे ते परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत असले तरी थेट हस्तक्षेप करण्याची घाई करत नाहीत. आजच्या आधुनिक जगात कोणीही कोणाचे कायमस्वरूपी रक्षक नसते. शीतयुद्धाच्या काळातील लष्करी आघाड्या आता इतिहासजमा झाल्या आहेत. आजचे युग हे आर्थिक हितसंबंधांचे आणि परस्परावलंबित्वाचे आहे. रशिया आणि चीनने इराणला वाऱ्यावर सोडून हेच दाखवून दिले आहे की, जोपर्यंत त्यांचे स्वतःचे राष्ट्रीय हित सुरक्षित आहे, तोपर्यंतच ते मित्र आहेत. चीनने दाखवून दिले आहे की जागतिक नेतृत्वासाठी लष्करी शक्तीपेक्षा आर्थिक ताकद वापरणे त्याला अधिक सोयीचे वाटते. इराणचे संकट हे ब्रिक्स आणि एससीओसारख्या संघटनांच्या मर्यादाही अधोरेखित करते. या संघटना केवळ व्यासपीठ म्हणून चांगल्या आहेत, पण संकटकाळी त्या लष्करी संरक्षण देऊ शकत नाहीत. इराण सध्या अशा चक्रव्यूहात अडकला आहे जिथून बाहेर पडणे त्याला कठीण जात आहे. रशियाची हतबलता आणि चीनच्या व्यापारकेंद्री दृष्टिकोनामुळे इराणला स्वतःच लढणे क्रमप्राप्त झाले आहे. जगाला वाटणारी क्रिंक आघाडी केवळ कागदी वाघ ठरली आहे. आज मित्र राष्ट्रे ही संकल्पना पूर्वीसारखी सरळ आणि ठाम राहिलेली नाही. मोठ्या शक्तींचे निर्णय आता भावनिक निष्ठेवर नव्हे तर थंड डोक्याने केलेल्या रणनीतिक गणितांवर अवलंबून असतात. इराणवरील हल्ल्यांकडे पाठ फिरवून रशिया आणि चीनने जगाला हाच संदेश दिला आहे, की 'मैत्री आपल्या जागी, पण व्यापार आणि स्वार्थ प्रथम!'

# चेहऱ्याच्या त्वचेसाठी पुदिना अत्यंत गुणकारी



● पचनक्रिया सुधारण्यासोबतच तोंडातील दुर्गंधीचा त्रास कमी करण्यासाठीदेखील पुदिना फायदेशीर ठरतो.

● पुदिन्याच्या पानांमध्ये 'मेन्थॉल' आणि 'ॲन्टी बॅक्टेरियल' गुणधर्म असतात. उन्हात फिरल्यामुळे त्वचेचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पुदिना फायदेशीर ठरतो. चेहऱ्यावर ॲक्ने, ब्रेकआऊट्स, सनबर्न, त्वचा लालसर होणे अशा अनेक समस्यांवर पुदिना परिणामकारक आहे.



● त्वचेसाठी मुलतानी मातीचा उपयोग स्त्रीवर्ग करत असतो. प्रामुख्याने तेलकट त्वचा असणाऱ्यांमध्ये त्वचेशी निगडित अनेक समस्या वाढतात. त्वचेतील तेल दूर करण्यासाठी, क्लिंजिंगसाठी मुलतानी मातीसोबतच पुदिनाही फायदेशीर ठरतो.

● मुलतानी माती, ताजी पुदिन्याची पानं, मध आणि दही एकत्र करा. हे मिश्रण सुमारे २० मिनिटं त्वचेवर लावा. फेसपॅक सुकल्यानंतर स्वच्छ पाण्यामध्ये चेहरा धुवा. या पॅकमुळे त्वचा मॉईश्चराईज होण्यास मदत होते.

● गुलाबपाणीदेखील त्वचेची पीएच व्हॅल्यू सुधारण्यास मदत करतात. यामधील दाहशामक गुणधर्म त्वचेचे सौंदर्य खुलवते. पुदिन्याच्या पानांसोबत मध आणि गुलाबपाणी यांचे मिश्रण देखील फायदेशीर आहे.

## पायांना आराम देण्यासाठी सरळ उपचार पद्धती

कामाच्या निमित्ताने सतत एका जागेवर बसून काम केल्याने पाय कडक होतात. ऑफिसमध्ये एकाजागी तासन् तास बसून काम करावे लागल्यामुळे या समस्यांना सामोरे जावे लागते. पाठदुखीचाही त्रास होत असतो. खाली दिलेल्या गोष्टींमुळे आपण पायांना आराम देऊ शकता.



● सर्वप्रथम जमिनीवर पाय समोर पसरून बसा.

● उजवा पाय गुडघ्यात वाकवून आपल्या डाव्या पायाच्या गुडघ्यावरून डाव्या पायापलीकडे ठेवा.

● उजव्या पायाचा गुडघा हाताने दाबून डाव्या खांद्याकडे न्या.

● आपल्या नितंबाला व कंबरेतील पेशींमध्ये तणाव जाणवेल तेव्हा आपली पाठ ताठ ठेवावी. २० सेकंद याच मुद्रेत राहून पाय जमिनीवर पसरवा. तसेच उजवा पाय पसरून हाच व्यायाम डाव्या पायावर करावा.

## रडण्यानेही वजन कमी होते!

**आपल्या** आजूबाजूला एखादी व्यक्ती जर रडत असेल तर त्या व्यक्तीस पहिला प्रश्न असतो तो म्हणजे, का रडत आहात? मानसिक स्थिती, वर्तणुकीतील बदल, कधी नैराश्य तर कधी अति उत्साहीपणा अशा अनेक कारणांमुळे माणसाच्या डोळ्यांमध्ये आपसूक पाणी येते. पण तुम्हाला ठाऊक आहे का? रडणं आरोग्यास एक प्रकारे लाभदायक सुद्धा ठरू शकतं. 'AsiaOne'ने सादर केलेल्या अहवालात रडण्यामुळे वजन कमी होते, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जेव्हा आपण रडतो तेव्हा आपल्या शरीरातून कॉर्टिसोल हार्मोन बाहेर सोडले जातात. शरीरातील हे वाढीव कॉर्टिसोल हार्मोन्स शरीरातील चरबी कमी करण्यास मदत करतात. तसेच, तणावग्रस्त अश्रू आपल्या शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करतात, जे वजन कमी करण्यासाठी फार फायद्याचे ठरते. असे कित्येक लोक असतात की त्यांना सहजपणे रडता येत नाही. त्यामुळे रडण्याचे फायदे आणि त्यामागील भावना अनुभवणे त्यांच्यासाठी कठीण होऊ शकते. तुम्हाला कदाचित माहीत नसेल, पण रडण्याचे सुद्धा प्रकार आहेत, असेही या अहवालात नमूद करण्यात आले आहे. रडण्याचे प्रामुख्याने तीन प्रकार पडतात. 'बेसल', 'रिफ्लेक्स' आणि 'मानसिक अश्रू.' आपल्या डोळ्यांना ओलसर ठेवण्याचे काम 'बेसल' अश्रू करतात. धूळ किंवा प्रदूषण यांपासून सुरक्षित ठेवण्याचे काम 'रिफ्लेक्स' अश्रू करतात. त्याचबरोबर मानसिक अश्रू वास्तविक भावना आणि मानवी भावनांसह जोडलेले असतात. मानसिक अश्रूंमुळे वजन कमी होण्यास मदत होते. जेव्हा आपण विश्रांती घेतो, तेव्हा आपल्या शरीरातील चरबी प्रत्येक तासाला वाढत असते. आपण भावनिकरीत्या तणावग्रस्त असतो तेव्हा आपल्या हृदयाची गती वाढते. त्यामुळे सायंकाळी ७ ते १० वाजण्याच्या दरम्यान रडल्यास वजन कमी होण्यास मदत होते. त्यामुळे यापुढे 'आय हेट टीअर्स....' म्हणण्यापेक्षा 'आय लव्ह टीअर्स' म्हणा आणि तुम्हाला कधीही रडायला येत असेल तर अश्रू थांबवू नका, त्यांना वाहू द्या.



## कमळकाकडीचे सॅलड

**कमळकाकडी किंवा कमळाचा देठ हे काश्मिरी, सिंधी, पंजाबी खाद्यसंस्कृतीमध्ये वापरल्याचे दिसून येते. तसेच मखणा (मखाना) म्हणजे कमळाच्या बीचाही खूप प्रमाणात उपयोग करतात. कमळाच्या देठामध्ये भरपूर पोषणमूल्य असते. ही कमळकाकडी महाराष्ट्रात सहज उपलब्ध असते. मुळासारखे दिसणारे देठ मातीने माखलेले असतात. वापरायच्या आधी ते पाण्याने स्वच्छ धुऊन घेणे आवश्यक असते. तसेच त्याचे बारीक काप करून पाण्यात व्हिनेगर किंवा लिंबाचा रस घालून १०-१५ मिनिटे भिजत ठेवून त्यातील माती स्वच्छ धुऊन वापरण्यास योग्य असते. पाण्यात न भिजवता ठेवली तर देठांचे काप काळे पडतात, त्यासाठी देठ भिजवून झाल्यावर उकळत्या पाण्यातून ब्लांच करून घ्यावी. त्यातही १-२ चमचे व्हिनेगर घालावे, म्हणजे ते पांढरेशुभ्र राहतात.**



**साहित्य :** कमळकाकडीची २-३ देठे, १ पिवळी आणि लाल भोपळी मिरची, ५-६ चेरी टोमॅटो, लेट्यूस.

**ड्रेसिंगसाठी :** २ चमचे ब्राऊन व्हिनेगर, २ चमचे सॅलड ऑइल किंवा ऑलिव्ह ऑइल किंवा १ चमचा तिळाचं तेल, १ चमचा मोहरीची पेस्ट किंवा पूड, चवीकरता चिल्ली फ्लेक्स, मीठ, मिरपूड.

**कृती :** वर सांगितल्याप्रमाणे कमळकाकडी धुऊन, बारीक काप करून ब्लांच करून घ्यावी. थंड करायला फ्रीजमध्ये ठेवावी. ड्रेसिंगचे सर्व साहित्य बाऊलमध्ये घेऊन ढवळून घ्यावे. भोपळी मिरची लांबट चिरून घ्यावी. चेरी टोमॅटोही कापून घ्यावेत. एका वाडग्यामध्ये लेट्यूस ठेवावा. त्यावर ब्लांच केलेली कमळकाकडी ठेवावी. त्यात भोपळी मिरची, चेरी टोमॅटो एकत्र करावे. यावर ड्रेसिंग घालावे. हे मस्त सॅलड फस्त करण्यास तयार आहे!

## स्मार्ट टीव्ही विकत घेताय?... 'या' पाच गोष्टी आधी नक्की तपासा!



**गेल्या काही वर्षांत आपल्या घरातील सर्वच प्रॉडक्ट्समध्ये फार मोठमोठे बदल झाले आहेत. यातील एक म्हणजे टेलिव्हिजन. आधी मोठे असणारे टीव्ही हळूहळू चपटे होत गेले आता तर अगदी स्लिम टीव्ही त्यातदेखील स्मार्ट टीव्ही आले आहेत. दरम्यान, आता तुम्हीही एखादा स्मार्ट टीव्ही घेणार असाल तर खूप सारे बजेट ऑप्शन्स तुम्हाला मिळतील, पण खूप ऑप्शन्स पाहून गडबड करू नका स्मार्ट टीव्ही घेताना काही महत्त्वाच्या गोष्टी नक्की चेक करा. टीव्ही खरेदी करताना, कलर व्हॉल्युम, एचडीआर, रिफ्रेश रेट, एचडीएमआय कनेक्शन आणि एचडीआर हे सारं समजून घ्या, अन्यथा तुम्हाला पश्चाताप होईल. प्रीमियम टीव्ही खरेदी करणं आपल्यापैकी अनेकांच्या बकेट लिस्टमध्ये असतं. पण नवीन टीव्ही खरेदी करताना, बहुतेक ग्राहक ज्या दोन गोष्टींकडे लक्ष देतात त्या म्हणजे टीव्हीचा आकार आणि त्याची किंमत. पण याशिवाय इतरही फीचर्सवर लक्ष द्यायला हवं ती कोणती आणि कसे हे जाणून घेऊ...**

**एचडीआर :** एचडीआर म्हणजेच हाय डायनॅमिक रेंज तंत्रज्ञान हे टीव्हीवर येणाऱ्या चित्रांमध्ये अधिक भारी रंग, ब्राइटनेस आणि कॉण्ट्रास्ट टाकते. गोरे अधिक पांढरे, काळे काळे आणि इतर रंग अधिक खोल दिसण्यासाठी एचडीआर ची सुरुवात केली आहे. एचडीआरमुळे टीव्हीवर एक भारी चित्र तयार होते आणि एक भारी अनुभव येतो.



◆ **रिफ्रेश रेट :** स्क्रीनवरील चित्र एका सेकंदात किती वेळा रिफ्रेश होते याला टीव्हीचा रिफ्रेश रेट म्हणतात. हे हर्ट्झमध्ये मोजले जाते. हर्ट्झ जितके जास्त तितके चित्र नितळ आणि सुंदर दिसते. साधारण टीव्हीमध्ये 60Hz तर उच्च श्रेणीतील टीव्हींमध्ये 120 Hz ते 144 Hz इतका रिफ्रेश रेट असतो. उच्च रिफ्रेश रेट टीव्ही कमीत कमी मोशन ब्लरसह स्पष्ट व्हिज्युअल वितरित करतात, जर तुम्ही गेमर असाल किंवा तुम्हाला ॲक्शन चित्रपट पाहणे आवडत असेल, तर उच्च रिफ्रेश रेट तुमच्यासाठी एक महत्त्वाची गोष्ट आहे.

◆ **एचडीएमआय :** एचडीएमआय म्हणजेच हाय डेफिनेशन मल्टीमीडिया इंटरफेस म्हणजे सोप्या शब्दात काय तर तुमच्या टीव्हीच्या स्क्रीनचा ज्यासाठीही वापर कराल ती गोष्टी एचडीएमआय केबलने जोडली जाते. म्हणजेच तुम्ही डिश टीव्हीवर काही पाहणार असाल किंवा गेमिंग कन्सोल जॉईन करून गेम खेळणार असाल हे सारं एचडीएमआयने केलं जातं. दरम्यान, चांगल्या गुणवत्तेच्या एचडीएमआय केबल्सने अधिक फास्ट आणि चांगला डेटा ट्रान्सफर होतो. टीव्ही ज्या प्रकारे त्याचे एचडीएमआय आणि इतर कनेक्शन हाताळतो, ते त्याच्या सेटअपवर अवलंबून असते. याशिवाय, आजकाल ड्युअल बँड वाय-फाय टीव्ही येऊ लागले आहेत, त्यामुळे हे ड्युअल बँड टीव्हीच खरेदी करण्यासाठी सध्या बेस्ट आहेत

◆ **स्क्रीन साईज :** टीव्ही विकत घेताना, त्याच्या स्क्रीनचा आकार ही एक फार महत्त्वाची गोष्ट असून आपण सारेच ती पाहतो. पण असंही होऊ शकतं की तुमची निवड आणि तुमच्या घराचा आकार एकमेकांच्या विरुद्ध असेल. म्हणजे तुमच्या हॉल किंवा बेडरूममध्ये जिथेही ठेवायचा आहे, त्या खोलीच्या अनुरूप आकाराचा टीव्ही घ्यावा. कारण खोली छोटी आणि टीव्हीची साईज मोठी झाल्यास तुम्हाला चांगला अनुभव येणार नाही.

◆ **कलर व्हॉल्युम :** कलर व्हॉल्युम म्हणजे काय तर टीव्हीच्या सर्व ल्युमिनन्स स्तरांवर अचूक रंग तयार करण्याची टीव्हीची क्षमता. कलर व्हॉल्युम जितका जास्त असेल तितका टीव्ही अधिक चांगले रंग देऊ शकतो. कलर व्हॉल्युमचे मोजमाप हा यूएचडी टीव्हीच्या विविध प्रकाश परिस्थितींमध्ये टीव्ही कसा कार्य करतो हे लक्षात घेऊन, पाहण्याचा अनुभव कसा आहे हे पाहण्याचा एक मार्ग आहे. कलर व्हॉल्युम महत्त्वाचा आहे, कारण जर एखादे चित्र टीव्हीच्या कमाल ल्युमिनन्सपेक्षा जास्त असेल, तर ते फिकट झालेले दिसेल, ज्यामुळे पाहण्याच्या अनुभवाची गुणवत्ता खराब होईल.

## उच्च रक्तदाब नियंत्रणासाठी सोप्या टीप्स



**संशोधनात** असे आढळून आले आहे की, दहामधून सात तरुणांना ब्लडप्रेशर जास्त असल्यामुळे हार्ट ॲटॅक किंवा स्ट्रोक येण्याची शक्यता जास्त असते. झोप कमी होणे, स्ट्रेस, डिप्रेशन, जास्त मीठ असलेले फास्ट फूड आणि डेस्क जॉब ही याची मुख्य कारणे आहेत. म्हणून...

▮ आठवड्यातून ३-४ दिवस कमीत कमी २० मिनिटे जॉगिंग करावी. जॉगिंग केल्याने ऑक्सिजन घेण्याच्या प्रक्रियेत सुधारणा होते आणि ब्लडप्रेशर नियंत्रित राहतो.

▮ रोज कमीत कमी ३० मिनिटांचे ब्रिस्क वॉक करावे.

▮ एरोबिक केल्याने हाय ब्लडप्रेशर कमी होते.

▮ तणावरहित राहण्यासाठी प्राणायाम, कपालभाती करावे.

## चमकदार त्वचेसाठी हे स्क्रब वापरून बघा

आपल्या चेहऱ्यावरील चमक हळूहळू कमी होत आहे, तर काळजी करू नका. आम्ही आपल्याला काही घरगुती स्क्रबबद्दल सांगत आहोत ज्यांना वापरून आपण आपल्या चेहऱ्यावरील चमक परत मिळवू शकता. चला तर मग वेळ न गमावता जाणून घेऊया की, आपण घरगुती स्क्रब कसा तयार करू शकता...

**साखर आणि लिंबू -** एक चमचा साखर घेऊन त्यामध्ये अर्धा चमचा लिंबाचा रस मिसळा. आता हळुवार हाताने याला आपल्या चेहऱ्यावर लावा आणि काही वेळ स्क्रब करून आपला चेहरा स्वच्छ धुवा.

**संत्र्याच्या सालीचे स्क्रब -** संत्र्याची साल आपल्या त्वचेला तजेलपणा आणण्यासाठी उपयुक्त आहे. यासाठी आपल्याला संत्र्याच्या सालीला वाळवून वाटून भुकटी करायची आहे. या भुकटीमध्ये थोडेसे कच्चे दूध मिसळून आपण चेहऱ्यावर लावू शकता. संत्र्याच्या सालाची भुकटी किंवा पावडर चांगले स्क्रब म्हणून काम करतं.

**तांदळाच्या पिठाचे स्क्रब -** तांदळाचे पीठ आणि दही सम प्रमाणात मिसळून घ्या. आता हे चेहऱ्यावर लावून हळुवार हाताने मालिश करा आणि काही वेळ तसेच ठेवून नंतर स्वच्छ पाण्याने धुऊन घ्या.

**बेकिंग सोडा स्क्रब -** घरच्या घरी आपला चेहरा उजळवायचा असल्यास २ मोठे चमचे बेकिंग सोडा, १ लहान चमचा दालचिनी पूड, अर्धा लिंबाचा रस आणि मध मिसळा. या पेस्टला आपल्या त्वचेवर ५ मिनिटे लावा. लक्षात ठेवा की या पेस्टचा वापर आठवड्यातून दोन वेळापेक्षा जास्त करू नये.



## पेरूची पानेदेखील उपयुक्त असतात, नक्की वाचा याचे फायदे



पेरू औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे. याच्या सेवनाने बरेच आरोग्यदायी फायदे मिळतात. उलट्या रोखण्यासाठी पेरू फायदेशीर आहे तसेच हृदयरोगापासूनदेखील बचाव होतो. तसे तर हे भारतात मिळणारे एक साधे फळ आहे, ज्याचे प्राचीन संस्कृत नाव अमृत किंवा अमृत फळ आहे. वाराणसीमध्ये याला लोक अमृत नावानेच संबोधित करतात. पेरूप्रमाणेच त्याची पानेदेखील खूप उपयुक्त असतात. यामध्ये अँटी ऑक्सिडन्ट, अँटी बॅक्टेरियल आणि अँटी इन्फ्लमेन्टरी गुणधर्म असतात, जे आपले अनेक आजारांपासून संरक्षण करतात. चला जाणून घेऊया पेरूच्या पानाचे फायदे.

पोटदुखी आणि उलट्यामध्ये आराम देतो : पेरूच्या पानात अँटी बॅक्टेरियल गुणधर्म असतात, याच्या पानाच्या पाण्याचे सेवन केल्याने आपल्या पोटाचे दुखणे दूर होऊ शकते. तसेच उलट्यापासून देखील आराम मिळतो. यासाठी पेरूच्या ५-६ पानांना १० मिनिटे उकळवून घ्या आणि नंतर गाळून त्याचे पाणी प्या.

सांधेदुखीचा त्रास दूर होतो : सांधेदुखीमध्येदेखील पेरूची पाने फायदेशीर आहेत. यासाठी आपण पेरूची पाने वाटून त्याचा लेप बनवा आणि त्या लेपाला सांध्यावर लावा, यामुळे आपल्याला वेदनेपासून आराम मिळेल.

मधुमेहातदेखील फायदेशीर : पेरूची पाने पाण्यात टाकून प्यायल्याने हे मधुमेहासाठी फायदेशीर मानले जाते. वास्तविक हे रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित करतं. याशिवाय हे शरीरातील जटिल स्टार्च साखरेमध्ये बदलण्यापासून रोखते, ज्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

दातदुखी, हिरड्यांची सूज कमी करते : पेरूच्या पानाचे पाणी दात दुखणे, हिरड्यांची सूज आणि तोंड येण्यापासून आराम देण्याचे काम करते. यासाठी पाने उकळवून त्या पाण्याने गुळण्या करा. असे केल्यास आपल्याला आराम मिळेल.

**बद्धकोष्ठता आणि गॅसच्या त्रासापासून मुक्ती मिळवण्यासाठी लसूण एक चमत्कारी औषध ठरेल. आयुर्वेदात लसूण हे चमत्कारिक गुणधर्म असलेले औषध म्हणून वर्णिले आहे, याचे बरेच फायदे आहेत. हे फक्त जेवण्याची चवच वाढवत नाही, तर शरीरास निरोगी ठेवण्यासदेखील मदत करते. याच कारणामुळे बऱ्याच घरगुती उपचारांमध्ये लसणाचा वापर केला जातो.**

## उपाशीपोटी लसूण खाण्याचे फायदे



**वास्तविक** लसणामध्ये अनेक प्रकारच्या पोषक घटकांचा समावेश आहे. यामध्ये कॅल्शियम ते तांबे, पोटॅशियम, फॉस्फरस, आयर्न आणि व्हिटॅमिन ई १ इत्यादींचा समावेश आहे. आपण लसणाचा वापर कोणत्याही प्रकारे करू शकतो. ते फायदेशीर आहेच; पण उपाशीपोटी खाल्ल्याने हे खूप फायदेशीर आहे. चला उपाशीपोटी याच्या सेवनाचे फायदे जाणून घेऊया.

**रोगप्रतिकारशक्ती मजबूत करतं -**

लसणाला प्रतिकारकशक्ती बळकट करण्यासाठी प्रभावी मानले आहे. अभ्यासात आढळून आले आहे की जे लोक दररोज लसणाचे सेवन करतात, त्यांना इतर लोकांपेक्षा सर्दी-पडसे कमी होते. सकाळी उपाशीपोटी त्याचे सेवन करणं जास्त फायदेशीर आहे.

**उच्च रक्तदाब असल्यास फायदेशीर -**

ज्या लोकांना उच्च रक्तदाबाची समस्या आहे, त्यांनी दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन करावे, कारण यामध्ये रक्तदाब नियंत्रित करण्याचे गुणधर्म आढळतात. लसूण चावून खाल्ल्याने उच्च रक्तदाबात आराम मिळतो.

**हृदयाचा धोका कमी होतो -**

लसूण हृदयरोगाच्या धोक्याला कमी करतं. जर हृदयाच्या रोगापासून वाचायचे असल्यास दररोज सकाळी लसणाचे सेवन करावे. मधासहदेखील लसणाचा सेवन करू शकतो. यामुळे रक्ताभिसरण योग्य राहते.

**पोटाशी निगडित त्रासापासून सुटका -**

दररोज उपाशीपोटी लसणाचे सेवन केल्यास पोटाशी निगडित त्रास जसे की बद्धकोष्ठता आणि गॅसपासून आराम मिळू शकतो. यामुळे पाचक प्रणालीदेखील चांगली राहील. जे लोक ॲसिडिटीच्या त्रासामुळे त्रस्त झाले आहेत, त्यांना भाजके लसूण खाण्याचा सल्ला दिला जातो.

## वजन कमी करण्यासाठी दिवसाला किती पोळ्या खाव्यात?

आपल्या दररोजच्या कॅलरीच्या प्रमाणाला लक्षात घेता पोळी किंवा भाकरीचे सेवन करावे. यामुळे आपल्या वाढत्या वजनाला कमी करण्यास मदत मिळेल. वजन कमी करण्यासाठी लोक आपल्या आहाराची काळजी घेतात. वास्तविक शरीरातील अतिरिक्त चरबी कमी करण्यासाठी कार्बोहायड्रेट घेणे टाळावे लागते. कार्बोहायड्रेटमुळे वजन झपाट्याने वाढते. पण कार्बोहायड्रेट हे आवश्यक मायक्रोन्यूट्रिएंट आहे, ज्याला वगळून चालणार नाही.



भारतातील आहाराबद्दल बोलायचे झाल्यास पोळी आणि भात हे कार्बोहायड्रेटचे चांगले स्त्रोत आहेत. जवळजवळ प्रत्येक घरात भात आणि पोळ्या नियमितपणे लोक खातात. परंतु जेव्हा वेळ येते वजन कमी करण्याची, तेव्हा लोकांना हे जाणून घ्यायचे असते की, दररोज किती पोळ्या खाव्या, जेणेकरून वजन वाढणार नाही. चला तर मग जाणून घ्या -

**गव्हामध्ये पौष्टिक घटक आढळतात :**

पोळ्यांमध्ये फक्त कार्बोहायड्रेटचं नव्हे तर इतर आवश्यक पोषक घटक देखील आढळतात. गहू हा प्रथिने, फॅट, फॉस्फरस, मॅग्नेशियम, फॉलेट आणि लोहाचा सर्वात चांगला स्त्रोत आहे. पोळी किंवा चपाती खाल्ल्याने शरीरास सर्व पोषक घटक मिळतात.

**दिवसात किती पोळ्या किंवा भाकऱ्या खाव्या?**

कार्बोहायड्रेट, प्रथिनं आणि फॅट किंवा चरबीला मायक्रोन्यूट्रिएंट म्हणतात. शरीरातील विविध कार्ये करण्यासाठी आपल्या शरीरास यांची गरज पडते. सर्वप्रथम आपल्याला हे ठरवावे लागणार की आपल्याला दररोज किती प्रमाणात कार्बोहायड्रेट घ्यायचे आहे. त्यानुसारच आपण दिवसाचा पोळीचा किंवा भाकरीचा आहार ठरवावा. ६ इंचाच्या लहान पोळीमध्ये ७१ कॅलरी आढळते. आपण दुपारच्या जेवणात ३०० कॅलरी घेतो, तर आपण दोन पोळ्या खाऊ शकतो. यापासून आपल्याला १४० कॅलरीज मिळतात आणि बाकीच्या कॅलरी आपल्याला सॅलड आणि भाज्यांपासून मिळते. लक्षात ठेवा की पोळीशिवाय आपण ज्या भाज्या आणि फळ घेत आहात त्यांच्यामध्ये देखील कार्बोहायड्रेट आढळते. म्हणून आपल्या कॅलरीच्या सेवन करण्यावरच हे अवलंबून आहे की आपल्याला दिवसात किती पोळ्या खायला हव्या. दिवसातून चार पोळ्या खाणे वजन कमी करण्यासाठी चांगले मानले जाते.

**पोळीचे इतर पर्याय :**

जर आपण वजन कमी करण्यासाठी प्रयत्नरत आहात, तर आपण गव्हाच्या पोळीव्यतिरिक्त ज्वारीची किंवा बाजरीची भाकरी देखील खाऊ शकता. या भाकऱ्या गव्हाच्या पोळीपेक्षा आरोग्यवर्धक असतात आणि यामध्ये कार्बोहायड्रेट कमी तर इतर पोषक घटक मुबलक प्रमाणात असतात.

**हे लक्षात घ्या :**

आहारात फक्त कार्बोहायड्रेटचे प्रमाण कमी केल्याने वजन कमी होत नाही. यासाठी आपल्याला इतर गोष्टी जशा की आपली जीवनशैली, झोपण्याची पद्धत आणि नियमितपणे व्यायामाची दिनचर्या या गोष्टी देखील आवश्यक आहेत. निरोगी आणि संतुलित आहारासह या गोष्टीकडे लक्ष द्यायला हवं.

## किचन स्वच्छ ठेवण्यासाठी काही टीप्स

**दररोज नोकरी किंवा व्यवसायामुळे आपल्याला आपल्या कामामधून वेळ मिळत नाही. अशा वेळी आपल्याला दररोज किचन साफ करणे जमत नाही. त्यामुळे ज्या गृहिणी कामामध्ये व्यस्त असतात, अशा गृहिणींसाठी काही खास टीप्स...**



▮ **डायनिंग टेबल :** डायनिंग टेबल हे दररोजच्या जेवणामुळे घाण झालेले असते. त्यामुळे डायनिंग टेबलला स्वच्छ करण्यासाठी नीलगिरीच्या तेलाचा वापर करू शकता. टेबलमधून दुर्गंधी येत असल्यास एखाद्या कापडावर नीलगिरी तेलाचे काही थेंब टाकून त्याने पुसून घ्या. ▮ **फ्रीज:** फ्रीजचे दार उकडलेल्या बटाट्याच्या सालींनी स्वच्छ केले जाऊ शकते. ▮ **नळ :** किचनमधील नळ चकचकीत करण्यासाठी त्यावर थोडीशी टूथपेस्ट लावा आणि गरम पाण्याने धुऊन टाका. ▮ **कचऱ्याचा डबा :** किचनमध्ये जिथे कचऱ्याचा डबा ठेवतो, ती जागा नियमितपणे फिनेल टाकून स्वच्छ करावी. कारण सर्वात जास्त घाण त्या जागेवर जमते. त्यामुळे बॅक्टेरिया पसरतात. किचनमध्ये नेहमी झाकण असलेले कचऱ्याचे डबे वापरा. ▮ **मिक्सर :** मिक्सर वापरताना तो वापरून झाल्यावर त्यावरील घाण साफ करून त्याला कव्हर घालून ठेवा. त्यामुळे त्यावर धूळ जमा होत नाही. ▮ **स्टोव्ह :** स्टोव्ह स्वच्छ करण्यासाठी संत्र्याचे साल वापरा. त्याने स्टोव्हला रॉकेलचा जास्त वास येत नाही.

# बालकांच्या सायबर सुरक्षिततेसाठी 'डिजिटल कवच' आवश्यक

## महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांची माहिती



### सायबर गुन्ह्यांविरुद्ध एकत्रित लढा आवश्यक

नागरिकांनी सायबर गुन्हे प्रतिबंधासाठी सायबर सुरक्षा विभागाला सक्रिय सहकार्य करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन अपर पोलीस महासंचालक (सायबर क्राइम) यशस्वी यादव यांनी केले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि आगामी काळातील क्वांटम कॉम्प्युटिंगमुळे तंत्रज्ञान क्षेत्रात मोठे बदल घडत आहे. सायबर गुन्हे किंवा मुलांशी संबंधित ऑनलाइन शोषणाबाबत १९३० या हेल्पलाइनवर तक्रार करता येते. सायबर गुन्ह्यांबाबत जागरूकता वाढवणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.



**■ बातमी /लेख,**
**प्रीती दिपक नाईक**

तंत्रज्ञानाचा सुरक्षित आणि जबाबदार वापर सुनिश्चित करत बालकांसाठी सुरक्षित डिजिटल वातावरण निर्माण करण्यासाठी 'डिजिटल कवच' उभारण्याची गरज असल्याचे मत महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केले.

बालकांच्या सुरक्षिततेसह डिजिटल युगातील आव्हानांचा सामना करण्यासाठी "महा-संकल्पः सुरक्षितता, शिक्षण आणि शाश्वत डिजिटल भारत" या नेतृत्व संवादाचे आयोजन जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटर येथे करण्यात आले. महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि चाइल्डफंड इंडिया यांच्यावतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाला आयोगाच्या अध्यक्षा नंदिनी आवडे, सचिव लक्ष्मण राऊत, अवर सचिव वंदना जैन, चाइल्ड फंड इंडियाचे कार्यकारी संचालक आनंद विश्वकर्मा तसेच विविध कॉर्पोरेट संस्थांचे प्रतिनिधी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी, वकील, प्राध्यापक, फिल्ममेकर आणि विविध क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.

### डिजिटल साक्षरतेवर भर

भविष्यात शाळांमध्ये डिजिटल साक्षरता वाढवणे, पालकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, तंत्रज्ञान कंपन्यांनी 'सेफ्टी बाय डिझाईन' तत्त्व स्वीकारणे, विविध विभागांमध्ये समन्वय वाढवणे आणि सीएसआर माध्यमातून कॉर्पोरेट सहभाग प्रोत्साहित करणे, यावर भर देण्यात येणार असल्याचेही आदिती तटकरे यांनी नमूद केले.

### विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

महिला व बालविकास विभागाकडून बालसंरक्षणासाठी चाइल्ड-फ्रेंडली मोबाईल व्हॅन स्क्वॉड सुरू करण्यात आले असून रस्त्यावर राहणाऱ्या व असुरक्षित बालकांपर्यंत पोहोचून त्यांना समुपदेशन, शिक्षण आणि पुनर्वसनाच्या सेवांशी जोडण्याचे काम या पथकांद्वारे केले जात आहे. यावेळी वेब सेफ अँड वाईज इनिशिएटिव्ह या उपक्रमाचा उल्लेख करताना महाराष्ट्र हे या उपक्रमाचे पायलट राज्य असल्याचे सांगण्यात आले. या माध्यमातून १२ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुरक्षितता, गोपनीयता, सायबर फसवणूक आणि जबाबदार डिजिटल वापर याबाबत मार्गदर्शन केले जात आहे. या उपक्रमात विद्यार्थी, शिक्षक, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या, पोलीस आणि समुदाय प्रतिनिधींचा सक्रिय सहभाग आहे.

### सायबर धोक्याबाबत चिंता व्यक्त

भारतात सुमारे ४४ कोटी मुले १८ वर्षांखालील असून 'विकसित भारत @२०४७' या ध्येयाकडे वाटचाल करताना बालकांचा सर्वांगीण विकास केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. इंटरनेटचा वाढता वापर, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल प्लॅटफॉर्ममुळे मुलांना शिक्षण व नवोपक्रमाच्या संधी उपलब्ध होत असल्या तरी सायबर बुलिंग, ऑनलाइन ग्रूमिंग, हानिकारक सामग्री आणि गेमिंग व्यसन यांसारख्या नव्या धोक्यांबाबत चिंता व्यक्त करत या चर्चासत्रातून प्रभावी उपाययोजना पुढे येतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# ई-वाहनांसाठी परवाना बंधनकारक

## मोटार वाहन विभागाकडे करावी लागणार नोंदणी




**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यात रिक्षा आणि टॅक्सींसाठी नवीन परमिट देण्याची प्रक्रिया गेल्या दोन दिवसांपासून तात्पुरती स्थगित करण्यात आली आहे. मात्र प्रवासी वाहतूक करणाऱ्या ई-रिक्षा व ई-बाइकना यापुढे मोटार वाहन विभागाकडे रितसर नोंदणी करुन परवाना घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.

इलेक्ट्रिक रिक्षांना (ई-रिक्षा) प्रवासी वाहतुकीसाठी स्वतंत्र परमिट घेण्याची सक्ती नव्हती. मात्र, वाढत्या ई-वाहनांच्या संख्येचा विचार करता केंद्र शासन अधिसूचनेनुसार प्रवासी वाहतुकीत एकसमान नियम लागू करण्यासाठी ई-रिक्षा व ई-बाइकसाठीही परमिट (परवाना) प्रक्रिया बंधनकारक करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

प्रवासी वाहतुकीच्या व्यवस्थेत पारदर्शकता वाढविणे आणि अनियमितता टाळण्यासाठी परिवहन विभागाने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पारंपरिक रिक्षा, टॅक्सी आणि इलेक्ट्रिक रिक्षा या सर्व प्रकारच्या वाहनांसाठी समान नियम लागू राहणार आहे. त्याचप्रमाणे परमिट प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी परिवहन विभागाकडून 'एक खिडकी योजना' सुरू करण्याची तयारी सुरू आहे.

# गिग वर्कर्सच्या गुन्ह्यांना बसणार लगाम

## पोलीस पडताळणी आणि सेंट्रल पोर्टलवर नोंदणी आता बंधनकारक

**■मुंबई। प्रतिनिधी,**

राज्यातील खाद्यपदार्थ आणि विविध वस्तू घरपोच देणाऱ्या 'गिग' वर्कर्सच्या माध्यमातून घडणाऱ्या गुन्ह्यांना रोखण्यासाठी आणि त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी राज्य सरकारने अत्यंत महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. कामगार मंत्री डॉ. आकाश फुंडकर यांनी विधानपरिषदेत घोषणा केली की, यापुढे सर्व गिग वर्कर्सची सेंट्रल पोर्टलवर नोंदणी करणे आणि त्यांची सक्तीची पोलीस चौकशी करणे बंधनकारक असेल. आमदार अभिजित वंजारी यांनी मांडलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्र्यांनी ही माहिती दिली. सध्या झोमॅटो, स्विगी, ब्लिंकिट यांसारख्या कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या कामगारांना अधिकृत 'कामगार' मानले जात नसल्याने त्यांना वेतनाची हमी मिळत नाही आणि अनेकदा कंपन्यांकडून त्यांची फसवणूक होते, ही बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देण्यात आली होती.



याच चर्चेदरम्यान, भाजप आमदार चित्रा वाघ यांनी गिग वर्कर्सकडून होणारे विनयभंग, बलात्काराचे प्रयत्न आणि इलेक्ट्रिक गाड्यांमुळे होणारे अपघात यांसारख्या गंभीर घटनांकडे सरकारचे लक्ष वेधले. यावर उत्तर देताना मंत्री फुंडकर यांनी स्पष्ट केले की, अशा अनुचित प्रकारांना आळा घालण्यासाठी कडक पोलीस पडताळणीची तरतूद बोर्डाच्या नियमावलीत समाविष्ट केली जाईल. तसेच, गिग कामगारांच्या नोकरीत स्थैर्य नसल्याने त्यांच्यासाठी 'नॅशनल सिक्युरिटी बोर्ड' स्थापन करण्यात येईल. या बोर्डाच्या माध्यमातून कामगारांना लाईफ अँड डिसॅबिलिटी कव्हर, आरोग्य आणि मातृत्व लाभ, वृद्धापकाळ संरक्षण आणि शैक्षणिक सुविधा पुरवण्याचा सरकारचा मानस आहे.

कंत्राटी कामगारांच्या सुरक्षिततेबाबत बोलताना मंत्र्यांनी सांगितले की, अद्याप नव्या केंद्रीय कायद्याची नियमावली अंतिम झालेली नाही. त्यामुळे सदस्यांनी सुचवलेल्या सुधारणा केंद्राकडे पाठवून गिग वर्कर्सना कामाच्या तासांनुसार योग्य मोबदला आणि सामाजिक सुरक्षा मिळवून देण्यासाठी सरकार कटिबद्ध आहे. या निर्णयामुळे केवळ कामगारांचे शोषण थांबणार नाही, तर घरपोच सेवा घेणाऱ्या नागरिकांच्या, विशेषतः महिलांच्या सुरक्षेचा प्रश्नही मार्गी लागण्यास मदत होणार आहे.

# गॅस सिलिंडर पुरवठ्यासाठी जिल्हास्तरीय विशेष समित्या स्थापन... राज्य सरकारचा निर्णय

**■मुंबई। प्रतिनिधी,**

युद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या घरगुती व व्यावसायिक वापराच्या गॅस सिलिंडर सुरळीत पुरवठ्याबाबत राज्य शासन उपाययोजना राबवत आहे. घरगुती एलपीजी गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात अडथळे निर्माण होऊ नयेत आणि संभाव्य टंचाईच्या परिस्थितीत समन्वय साधण्यासाठी राज्य शासनाने जिल्हास्तरावर विशेष समित्या स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे.



### विशेष समितीत वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश

जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हा पुरवठा अधिकारी आणि सर्व सरकारी गॅस कंपन्यांचे अधिकारी यांचा या समित्यांमध्ये समावेश असेल. गॅस पुरवठा साखळीवर देखरेख ठेवणे, कायदा व सुव्यवस्था राखणे तसेच दररोज परिस्थितीचा आढावा घेऊन अहवाल सादर करणे ही समित्यांची प्रमुख जबाबदारी असेल. मुंबई-ठाणे रेशनिंग क्षेत्रात नियंत्रक, रेशनिंग यांच्या नियंत्रणाखाली स्थापन केलेल्या समितीत पोलीस उप आयुक्त आणि उपनियंत्रक (रेशनिंग) समितीत समावेश करण्यात येणार आहे.

राज्यामध्ये एलपीजी सुरळीत ठेवण्याविषयी तसेच पुरवठ्यावर नियंत्रण ठेवण्याच्या अनुषंगाने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी दिले आहेत.

घरगुती गॅस सिलिंडरचा पुरवठा सुरळीत होत राहील, याची नागरिकांनी निश्चिंतता बाळगावी, अशी ग्वाही अन्न व नागरी पुरवठा, ग्राहक संरक्षण विभागामार्फत देण्यात आली आहे.

मार्चमध्ये गेल्या सहा महिन्यांच्या तुलनेत अधिक प्रमाणात घरगुती गॅस सिलिंडर उपलब्ध असून युद्धाच्या पार्श्वभूमीवर घरगुती गॅस सिलिंडर पुरवठा सुरळीत राहील याच्या खबरदारी घेण्याच्या सूचना विभागामार्फत सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

पर्यायी इंधनाच्या वापराची शक्यता तपासण्याचे निर्देशही यंत्रणांना दिले आहेत. कोळसा, रॉकेल आदी पर्यायांचा विचार केला जाणार असला तरी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

# 'व्हॅलेंटाईन' चा 'प्रेमळ' सापळा अन्... नराधमाकडून 17 वर्षीय मुलीसोबत अत्यंत घाणेरडं कृत्य

### कसा उघडकीस आला अत्याचार?

पीडित मुलगी काही दिवसांपूर्वी आजारी पडली. जेव्हा तिची वैद्यकीय तपासणी करण्यात आली, तेव्हा ती तीन महिन्यांची गर्भवती असल्याचे समोर आले. आपल्यासोबत झालेली फसवणूक आणि क्रूरता लक्षात येताच, मुलीने धाडस करून कोरची पोलीस ठाणे गाठले आणि आपबिती सांगितली. फियार्दीवरून कोरची पोलिसांनी ११ मार्च रोजी आरोपी अजय कल्लो याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याच्यावर खालील कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

- भारतीय न्याय संहिता : कलम ६४ (२) (एम) आणि ६४ (२) (आय)
- पोक्सो कायदा: अल्पवयीन मुलीवरील अत्याचारासाठी कडक तरतुदी.

पोलीस निरीक्षक शैलेंद्र ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

**■गडचिरोली। प्रतिनिधी,**

प्रेमाचा दिवस मानल्या जाणाऱ्या 'व्हॅलेंटाईन डे'चा आधार घेऊन 25 वर्षीय नराधम तरुणाने 17 वर्षीय अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले आणि लग्नाचे खोटे आमिष दाखवून तिच्यावर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना गडचिरोली जिल्ह्यात उघडकीस आली आहे. या प्रकरणी कोरची पोलिसांनी 25 वर्षीय आरोपीला अटक केली असून, या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे.

घटनेची अधिक माहिती अशी की,





अजय टिल्लू कल्लो (वय 25, रा. जांभळी) याने 14 फेब्रुवारी 2025 रोजी, म्हणजेच व्हॅलेंटाईन डेच्या दिवशी एका 17 वर्षीय अल्पवयीन मुलीला गाठले. "तू मला खूप आवडतेस," असे म्हणत प्रपोज केलं. त्यानंतर त्याने हळूहळू लग्नाची आमिष दाखवलं. वयात येत असलेल्या त्या मुलीला अजयच्या शब्दांवर विश्वास बसला आणि तिथूनच या शोषणाची सुरुवात झाली.

अजयने पीडित मुलीला लग्नाचे वचन दिले आणि तिला आपल्या विश्वासात घेतले. या विश्वासाचा फायदा घेत त्याने तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. एका वर्षाहून अधिक काळ, म्हणजेच 10 मार्च 2026 पर्यंत अजय तिला लग्नाचे स्वप्न दाखवत वारंवार तिच्यावर अत्याचार करत राहिला.

# 'नवरा माझ्यासमोरच सख्ख्या बहिणीसोबत संबंध ठेवतो, पोलिस कारवाईला घाबरतात...'

## बायकोची महिला आयोगाकडे तक्रार






### जबरदस्तीने रुममध्ये बसवले जाते

एका पीडित महिलेने तिचा पती स्वतःच्या सख्ख्या बहिणीसोबत शारीरिक संबंध ठेवत असल्याचा गंभीर आरोप केला. इतकेच नव्हे तर, हे कृत्य सुरु असताना तिला जबरदस्तीने त्याच रुममध्ये थांबायला लावले जात असल्याचेही तिने नमूद केले. मध्यप्रदेशची राजधानी भोपाळमध्ये सुरु असलेल्या महिला आयोगाच्या जनसुनावणीदरम्यान हा प्रकार समोर आला.

**■गडचिरोली। प्रतिनिधी,**

राष्ट्रीय महिला आयोगाच्या जनसुनावणीत एका महिलेने आपल्याच घरात सुरु असलेल्या भयानक प्रकाराचा खुलासा केल्याने चांगलीच खळबळ उडाली आहे. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांच्यासमोर आलेल्या या तक्रारीने नात्यांवरच गंभीर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

### पोलिस कारवाईला का घाबरतात?

पीडितेने प्रशासनावर ताशेरे ओढताना सांगितले की, तिने या प्रकरणाबाबत पोलीस आणि सासरच्या मंडळींकडे वारंवार मदतीची याचना केली, मात्र कोणीही तिला साथ दिली नाही. उलट पोलिसांनी तिची तक्रार नोंदवण्यासही नकार दिला. तक्रार नोंदवायला पोलिस का घाबरतात हे मला समजत नसल्याचंही पीडितेने सांगितले. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी उपस्थित पोलीस अधिकाऱ्यांना या प्रकरणाची सखोल चौकशी करून तात्काळ कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत.

### विजया रहाटकर काय म्हणाल्या?

आयोगाच्या अध्यक्षा विजया रहाटकर यांनी स्पष्ट केले की, ज्या महिला दिल्लीतील मुख्यालयापर्यंत पोहोचू शकत नाहीत, त्यांच्यासाठी आयोग स्वतः विविध राज्यांमध्ये जाऊन जनसुनावणी घेत आहे. महिलांच्या सुरक्षा आणि न्यायाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, असा विश्वास त्यांनी यावेळी दिला. यावेळी जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्तांच्या उपस्थितीत अनेक कौटुंबिक वादांवर घटनास्थळीच तोडगा काढण्यात आला. जनसुनावणीत आलेल्या या तक्रारींनी राज्यातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत आणि पोलिसांच्या कार्यपद्धतीवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे.

# आठवीत शिकणारी विद्यार्थिनी गर्भवती, पोटात दुखू लागल्यानंतर सगळंच आलं समोर... नेमकं काय घडलं?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

एका आठवीत शिकणाऱ्या अल्पवयीन मुलीवर सहा महिने सलग अत्याचार झाल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. पीडित मुलगी गर्भवती राहिल्याचे उघड झाल्यानंतर या प्रकरणाचा खुलासा झाला असून, आरोपीने भीती दाखवून हे कृत्य केल्याचे समोर आले आहे. या घटनेमुळे परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असून, पीडितेच्या कुटुंबीयांनी पोलिसांत धाव घेत न्याय मिळवून देण्याची मागणी केली आहे. मध्यप्रदेशातील भिंड जिल्ह्यातील ही घटना आहे.

### बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांची धाव

या घटनेची माहिती मिळताच बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांनीही पोलीस ठाण्यात धाव घेत पीडितेच्या कुटुंबाला पाठिंबा दिला. दलित समाजातील मुलींना लक्ष्य करून अशा प्रकारे फसवणुकीच्या घटना घडत असल्याचा आरोप कार्यकर्त्यांनी केला असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. रौन पोलीस सध्या या प्रकरणाचा सखोल तपास करत असून, फरार झालेल्या मुख्य आरोपी साहिलच्या शोधासाठी पथके रवाना करण्यात आली आहेत.

### जबरदस्तीने केले अत्याचार

मिळालेल्या माहितीनुसार, पीडित मुलीची तिच्याच शेजारी राहणाऱ्या दोन सख्ख्या बहिणींशी मैत्री झाली होती. या बहिणी तिला वारंवार आपल्या घरी बोलावून घेत असत. याच दरम्यान त्यांनी आपला भाऊ साहिल याच्याशी पीडितेची ओळख करून दिली आणि त्यांच्यात संवाद वाढवला. एके दिवशी या दोघी बहिणींनी पीडितेला घरी बोलावून तिला खोलीत एकटे सोडून बाहेरून कडी लावून घेतली. याच संधीचा फायदा घेत साहिलने तिच्यावर जबरदस्तीने अत्याचार केले आणि कोणाला सांगितल्यास बदनाम करण्याची धमकी दिली.

### गर्भवती राहिल्यानंतर प्रकार समोर

या धमकीला घाबरून पीडितेने कोणालाही काही सांगितले नाही, ज्याचा फायदा घेत आरोपी साहिल गेल्या सहा महिन्यांपासून तिच्यावर वारंवार अत्याचार करत होता. दरम्यान, मुलीच्या पोटात दुखू लागल्याने कुटुंबीयांनी तिला रुग्णालयात नेले असता, ती गर्भवती असल्याचे समजताच पालकांच्या पायाखालची जमीन सरकली. आईने विश्वासात घेऊन विचारणा केली असता, पीडितेने घडलेला सर्व प्रकार सांगितला. यानंतर पीडितेच्या पालकांनी तात्काळ पोलीस ठाणे गाठून आरोपी साहिल आणि त्याला मदत करणाऱ्या त्याच्या दोन बहिणींविरुद्ध तक्रार दाखल केली.



# तीन मुली झाल्या, दुसरं लग्न करण्याची परवानगी दे

## सासरच्या छळाला कंटाळून विवाहितेची विष प्राशन करून आत्महत्या

### सासरच्या तिघांविरोधात गुन्हा दाखल

सासरच्या या छळाला कंटाळून भक्तीने 2 फेब्रुवारी 2026 रोजी सकाळी राहत्या घरी विष प्राशन केले होते. तिला तातडीने बीड येथील जिल्हा रुग्णालयात आणि त्यानंतर खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र, आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने तिला पुन्हा सरकारी दवाखान्यात हलवण्यात आले, जिथे उपचारादरम्यान 6 मार्च 2026 रोजी तिची प्राणज्योत मालवली. भक्तीची आई गंगुबाई प्रभू ठोकळ यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अमोल अर्जुन कोरडे, अर्जुन साधू कोरडे आणि आशाबाई अर्जुन कोरडे यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम 108, 115(2), 3(5) आणि 85 अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अर्जुन घोलवाल करत आहेत.



**■बीड। प्रतिनिधी,**

बीड तालुक्यातील म्हाळसापूर येथे एका 24 वर्षीय विवाहितेने सासरच्या जाचाला कंटाळून विषारी औषध प्राशन करून आपली जीवनयात्रा संपवल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. भक्ती अमोल कोरडे असे मृत विवाहितेचे नाव असून, याप्रकरणी पिंपळनेर पोलीस ठाण्यात पती, सासू आणि सासऱ्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आत्महत्या केलेल्या भक्तीला तीन मुली झाल्या होत्या, याच कारणावरून तिचा गेल्या अडीच वर्षांपासून शारीरिक व मानसिक छळ केला जात होता. नवऱ्याला दुसरे लग्न करण्यासाठी संमती द्यावी, यासाठी तिला वारंवार मारहाण करून एका बाँड पेपरवर लिहून देण्याची सक्ती केली जात असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

# लग्नाच्या आमिषाने बलात्कार, तरुणी चार महिन्यांची गर्भवती... पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी आरोपीने




**■जालना। प्रतिनिधी,**

जालना जिल्ह्यात विवाहाचे आमिष दाखवून एका तरुणीवर अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना बदनापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून, या घटनेमुळे संपूर्ण जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने पीडित तरुणीला लग्नाचे वचन देऊन तिच्याशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. या दरम्यान पीडिता चार महिन्यांची गर्भवती राहिल्यानंतर आपली फसवणूक झाल्याचे तिच्या लक्षात आले, त्यानंतर तिने पोलिसांत धाव घेऊन तक्रार दाखल केली.

### 'असे' समोर आले खरे वय

पोलिसांना आरोपीने सादर केलेल्या कागदपत्रांवर संशय आल्याने त्यांनी या कागदपत्रांची सखोल पडताळणी केली. या चौकशीत आरोपीचे खरे वय 18 वर्षे 6 महिने असल्याचे उघड झाले आणि त्याचा बनावट कागदपत्रांचा डाव फसला. बदनापूर पोलीस ठाण्याचे पीएसआय अजय जयस्वाल यांनी सांगितले की, आरोपीने बनावट दस्तऐवज सादर करून पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न केला होता, परंतु पोलिसांनी तांत्रिक तपासणीद्वारे त्याचे खरे वय समोर आणले आहे.

### बनावट जन्म प्रमाणपत्र सादर केले

पीडित तरुणीच्या वैद्यकीय तपासणीनंतर पोलिसांनी तातडीने गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे फिरवली आणि आरोपीला अटक केली. मात्र, तपासादरम्यान एक धक्कादायक बाब उघडकीस आली. आरोपीने कायद्याच्या कचाट्यातून सुटण्यासाठी आणि शिक्षा कमी करून घेण्याच्या उद्देशाने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. त्याने स्वतःचे बनावट जन्म प्रमाणपत्र सादर करून आपले वय केवळ 16 वर्षे 6 महिने असल्याचे भासवले, जेणेकरून त्याला अल्पवयीन घोषित केले जावे.

### आरोपीला न्यायालयीन कोठडी

या गंभीर गुन्ह्यातील आरोपीला सध्या न्यायालयात हजर केले असता, त्याला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. पोलीस आता या संपूर्ण प्रकरणाचा पुढील तपास करत असून, बनावट कागदपत्रे तयार करण्यात त्याला कोणाची मदत झाली, याचाही शोध घेतला जात आहे. विवाहाचे आमिष दाखवून लैंगिक शोषण आणि त्यानंतर वयाबाबत केलेली फसवणूक यामुळे या प्रकरणाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com